Scan this QR code using the WhatsApp camera to join this group
क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १९६ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. ३ सप्टेंबर २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## मागण्या पूर्ण, आंदोलन संपले; नुकसान भरपाईचे काय?

### उच्च न्यायालयाची जरांगे आणि आयोजकांना विचारणा

विदर्भ प्रजासत्ताक
दि.३मुंबई

मराठा समाजाला कुणबी प्रवर्गातून आरक्षण देण्याची मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांची मागणी राज्य सरकारने मान्य केली. त्यानंतर, जरांगे यांनी पाच दिवसांपासून आझाद मैदानात केलेले आमरण उपोषण सोडले आणि आंदोलनही संपले. हे सगळे असले तरी पाच दिवसांच्या आंदोलनदरम्यान मुंबईत सार्वजनिक मालमत्तेच्या झालेल्या नुकसान भरपाईचे काय ? अशी विचारणा करून त्याबाबत प्रतिज्ञापत्राद्वारे भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने बुधवारी जरांगे आणि आंदोलनाच्या आयोजकांना दिले.

जरांगे यांनी चिथावणी दिल्याने मोठ्या प्रमाणात आंदोलक मुंबईत दाखल झाल्याचा गंभीर आरोप करण्यात



आला आहे. त्यामुळे, याबाबतही जरांगे आणि आंदोलनाच्या आयोजकांनी प्रतिज्ञापत्राद्वारे भूमिका स्पष्ट करणे आवश्यक आहे, असे प्रभारी मुख्य न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती आरती साठे यांच्या खंडपीठाने नमूद केले. त्यावर जरांगे यांनी अशा प्रकारची कोणतीही भाषणे केलेली नाहीत. किंबहुना, आंदोलनाच्या पहिल्या दिवसापासून ते उपोषणाला बसले होते, असा दावा करून जरांगे आणि आंदोलनाच्या आयोजकांनी आरोपांचे खंडन केले. त्याची दखल घेऊन तोंडी माहिती देऊ नका, तर प्रतिज्ञापत्राद्वारे भूमिका स्पष्ट करा, असे आदेश न्यायालयाने दिले.

तसेच, विषय मार्गी लागला असल्याने याचिका प्रलंबित ठेवण्यात अर्थ नाही. परंतु, आम्हाला काहीही तोंडी नको आहे. त्यामुळे, जरागे आणि आदोलनाच्या आयोजकांनी प्रतिज्ञापत्रावर बाजू मांडावी. त्यानंतर याचिका निकाली काढली जाईल, असे स्पष्ट करून न्यायालयाने हे प्रतिज्ञापत्र सादर करण्यासाठी जरांगे आणि आयोकांना चार आठवड्यांची मुदत दिली.

तत्पूर्वी, आंदोलन सरकारच्या मध्यस्थीने संपल्याची माहिती न्यायालयाला देण्यात आली असता आंदोलन काळात मोठ्या प्रमाणात सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झाले आहे. त्याची भरपाई कोणाकडून वसूल करणार, असा प्रश्न न्यायालयाने उपस्थित केला. त्यावर, पोलिसांनी या प्रकरणी काही गुन्हे दाखल केले आहेत. त्यामुळे, त्याद्वारे भरपाईचा मुद्दा निकाली लावला जाईल, असे आंदोलनाच्या आयोजकांतर्फे न्यायालयाला सांगण्यात आले.

तर, आंदोलकांनी रस्ते, पदपथ, बस व रेल्वे स्थानके अडवण्यापलिकडे काहीही नुकसान केलेले नाही, असे जरांगे यांच्या वतीने न्यायालयाला सांगण्यात आले. त्यावर, न्यायालयाने काही छायाचित्रे दाखवत यात नुकसान झाल्याचे दिसत असल्याचे म्हटले. तसेच, समन्वयाचा अभाव किंवा अन्य कारणामुळे हे सगळे घडले असावे. परंतु, नुकसान झाल्याचे छायाचित्रांतून दिसत आहे याचा पुनरूच्चार न्यायालयाने केला. तेव्हा आंदोलकांनी सार्वजनिक मालमत्तेचे कोणत्याही प्रकारे नुकसान केले नसल्याचे जरांगे आणि आंदोलनाच्या आयोजकांनी पुन्हा एकदा न्यायालयाला सांगण्याचा प्रयत्न केला.

## मराठा आंदोलनाप्रकरणी मुंबईत नऊ गुन्हे दाखल

विदर्भ प्रजासत्ताक
दि.३मुंबई

गेल्या तीन दिवसांमध्ये मराठा आरक्षणासाठी करण्यात आलेल्या आंदोलनामुळे निर्माण झालेला अडथळा आणि रस्ता रोकोसह सार्वजनिक सुव्यवस्थेत बाधा आणल्याच्या आरोपावरून मुंबई पोलिसांनी तब्बल नऊ गुन्हे दाखल केले आहेत. हे सर्व गुन्हे सोमवारी नोंदवण्यात आले असून, अद्याप कोणालाही अटक करण्यात आलेली नाही.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हे गुन्हे बेकायदेशीर जमाव जमवणे आणि रस्ता रोको यासारख्या कलमांखाली नोंदवण्यात आले आहेत. काही ठिकाणी आंदोलनकर्त्यांनी जबरदस्तीने क्रिकेट क्लब ऑफ इंडिया परिसरात प्रवेश करण्याचा प्रयत्न केल्याचेही अधिकाऱ्याने सांगितले.



या संदर्भात आझाद मैदान पोलीस ठाण्यात तीन, मरीन ड्राईव्ह पोलीस ठाण्यात दोन, तर एमआरए मार्ग, जे.जे. मार्ग, डोंगरी आणि कुलाबा येथील पोलीस ठाण्यांत प्रत्येकी एक गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, हे सर्व गुन्हे सोमवारी नोंदवले असून, यात सहभागी सर्वांची ओळख पटवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मात्र संबंधित कलमांमध्ये सात वर्षांपेक्षा कमी शिक्षा असल्याने अद्याप अटक करण्यात आलेली नाही, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

दरम्यान, साधारणपणे राजकीय आंदोलनांतील गुन्हे काही महिन्यांनंतर मागे घेण्यात येतात, अशी माहिती सूत्रांनी दिली. बहुतेक प्रकरणांमध्ये आंदोलकांनी वाहतूक ठप्प करणे, सार्वजनिक ठिकाणी गोंधळ घालणे आणि पोलिसांनी घालून दिलेल्या अटींचे उल्लंघन करणे यासंबंधी तक्रारी आहेत.

## 'मराठा'च्या धर्तीवर ओबीसींसाठी मंत्रिमंडळ उपसमिती- राज्य सरकारचा निर्णय



विदर्भ प्रजासत्ताक दि.३मुंबई

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या मागणीनुसार राज्य सरकारनं दोन 'जीआर' काढल्यानंतर ओबीसी नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. तसंच मंत्रिमंडळ बैठकीवरही बहिष्कार घातला. त्यामुळं ओबीसी समाजाचा रोष टाळण्यासाठी राज्य सरकारनं मराठा समाजाच्या धर्तीवर ओबीसी समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी मंत्रिमंडळ उपसमितीची स्थापना करण्याचा निर्णय घेतलाय.

बुधवारी (३ सप्टेंबर) मंत्रिमंडळ बैठकीत ओबीसी समाजासाठी उपसमिती नियुक्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला. महायुती सरकारमधील प्रत्येक पक्षाचे दोन मंत्री या समितीत असणार आहेत. दरम्यान, मंत्री छगन भुजबळ यांना या समितीचं अध्यक्षपद दिलं जाण्याची शक्यता आहे. मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखालील मराठा आरक्षण उपसमितीनं मराठा आरक्षणाचा तिढा सोडवल्यामुळं ही समिती चर्चेत आलीय. त्याच धर्तीवर ओबीसी समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी उपसमितीची स्थापना करण्यात येणार आहे.

## कुख्यात गुंड, डॉन अरुण गवळी अखेर १८ वर्षांनी जामिनावर तुरुंगाबाहेर, मुंबईला रवाना

विदर्भ प्रजासत्ताक
दि.३नागपूर

कुख्यात गुंड अरुण गवळी जामिनीवर नागपूरच्या मध्यवर्ती तरुंगातून बाहेर आला. नागपूर पोलिसांनी सुरक्षा व्यवस्थेत अरुण गवळीला नागपूरच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळापर्यंत आणले. तेथून गवळी विमानाने मुंबईकडे रवाना झाला.

अंडरवर्ल्ड डॉन आणि माजी आमदार अरुण गवळी याला सर्वोच्च न्यायालयाकडून १८ वर्षांनंतर जामीन मंजूर झाला असून, (मंगळवारी) त्याची



नागपूरच्या मध्यवर्ती कारागृहातून सुटका करण्यात आली. नागपूर पोलिसांनी सुरक्षा व्यवस्थेत अरुण गवळीला नागपूरच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विमानतळापर्यंत नेले. आणि त्यानंतर अरुण गवळी विमानाने मुंबईच्या दिशेने रवाना झाला.

विशेष म्हणजे, गवळीला कारागृहामागील गेटमधून गुपचूप बाहेर सोडण्यात आले. त्याची सुटका गुप्त ठेवण्यासाठी कारागृह प्रशासन आणि पोलिसांनी विशेष खबरदारी घेतली. गवळीवर २००६ मध्ये शिवसेना नगरसेवक कमलाकर जामसांडेकर यांच्या हत्येचा आरोप ठेवण्यात आला होता. या प्रकरणात त्याला अटक झाली होती. त्यानंतर २०१२ मध्ये मुंबई सत्र न्यायालयाने गवळीला जन्मठेपेची शिक्षा आणि १७ लाख रुपयांचा दंड ठोठावला. या निकालाविरोधात त्यांने मुंबई उच्च न्यायालयात अपील केले होते, मात्र २०१९ मध्ये उच्च न्यायालयानेही त्यांना दिलेली शिक्षा कायम ठेवली.


गवळीच्या सुटकेनंतर पोलीस आणि सुरक्षा यंत्रणाही सतर्क झाल्या आहेत. कारण, त्याचा भूतकाळ लक्षात घेता कायदा–सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. आता फेब्रुवारी २०२६ मध्ये होणाऱ्या सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयावर गवळीचे राजकीय आणि सामाजिक भविष्य अवलंबून आहे.

## शालेय विद्यार्थ्यांनी भरलेली बसउलटली ३० विद्यार्थी जखमी, तीन जण गंभीर

विदर्भ प्रजासत्ताक
दि.३नंदुरबार

सकाळी शाळेत जात असलेल्या विद्यार्थ्यांनी भरलेल्या परिवहन महामंडळाच्या बसला अपघात झाला. वाल्हेरीहून तळोदाच्या दिशेने जात असलेली बस पलटी झाल्याने अपघात झाला. यात बसमधील २५ ते ३० विद्यार्थी जखमी झाले असून यातील तीन जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असून घटनास्थळी विधानसभेचे आमदार राजेश पाडवी दाखल झाले आहेत.

नंदुरबारच्या तळोदा तालुक्यात आज सकाळी राज्य परिवहन महामंडळाच्या बसच्या भीषण अपघाताची घटना घडली आहे. वाल्हेरी येथे मुक्कामी बस असल्याने



या बसने रोज विद्यार्थी शाळा व महाविद्यालयात जात असतात. त्यानुसार आज देखील वाल्हेरी येथून तळोद्याकडे जाणारी विद्यार्थ्यांनी भरलेली मुक्कामी बस सकाळी साधारण ६.३० वाजता निघाली होती. या बसमध्ये ७० ते ७५ विद्यार्थी प्रवास करत होते.

**तीन विद्यार्थ्यांची प्रकृती गंभीर**

दरम्यान गावातून बस मार्गस्थ झाल्यानंतर पाच मिनिटाच्या अंतरावर बस भवर फाट्याजवळ पोहचल्यानंतर चालकाचे नियंत्रण सुटल्याने बस रस्त्याच्या खाली उतरून पलटी होऊन बसला अपघात झाला. या अपघातात २५ ते ३० विद्यार्थी जखमी झाले आहेत. तर जखमीतील ३ विद्यार्थ्यांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती समोर आली आहे. सर्व जखमींना जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

## ''मी टीकाकार असलो तरी'', कालचे संपूर्ण श्रेय फडणवीसांनाच - संजय राऊत

विदर्भ प्रजासत्ताक
दि.३मुंबई

राज्य सरकारने मराठा आरक्षणासंदर्भातील मागण्या मान्य करत जीआर काढल्यानंतर, मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांचे आरक्षणाच्या मुद्द्यावरून मुंबईतील आझाद मैदानावर सुरू असलेले उपोषण सोडले. यासंदर्भात आता शिवसेना नेते तथा खासदार संजय राऊत यांची पहिली प्रतिक्रिया आली आहे. यासंदर्भात स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे पडद्यामागे काम करत होते. म्हणजे, अगदी मी त्यांचा टीकारार असतो, तरी हे मी सांगू शकतो की, कालचे संपूर्ण श्रेय हे देवेंद्र फडणवीस यांचेच आहे, असे राऊत यांनी म्हटले आहे. ते मुंबईत पत्रकारांसोबत बोलत होते.

यावेळी, काल जरांगे पाटलांची इच्छा होती की, मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्यांनी त्यांचे उपोषण सोडवण्यासाठी व्यासपीठावर यावे, पण त्यावेळी ती मान्य झाली नाही, कारण प्रत्येक नेता वेगवेगळ्या ठिकाणी असल्याचे सांगण्यात आले? असे एका पत्रकाराने विचारले असता, राऊत म्हणाले, महाराष्ट्राच्या राजधानितला हा अतिशय गंभीर प्रश्न होता. अशा वेळेला सर्वांनी महाराष्ट्राच्या राजधानीमध्ये राहणे आवश्यक होते. कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न होता. मुंबई संदर्भातील काही प्रश्न निर्माण झाले होते. अशा वेळेला मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी परिस्थितीवर नियंत्र ठेवण्यासाठी, कधीही भडका उडू शकत होता. मुंबईतच थांबणे आवश्यक होते.

राऊत पुढे म्हणाले, स्वतः देवेंद्र फडणवीस या वाटाघाटीत गुंतलेले होते. हे मला माहीत आहे. की, कशा प्रकारे यातून मर्ग काढायचा? हाय



कोर्टाच्या निर्णयानंतर आपण कशा प्रकारची पावले टाकायला हवीत? किंवा उपसमितीने कोणती भूमिका घेऊन जरांगे पाटलांकडे जायला हवे? यासंदर्भात स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे पडद्यामागे काम करत होते. म्हणजे, अगदी मी त्यांचा टीकारार असतो, तरी हे मी सांगू शकतो की, कालचे संपूर्ण श्रेय हे देवेंद्र फडणवीस यांचेच आहे. यासंदर्भात त्यांच्या ज्या सहकाऱ्यांनी जरांगे पाटील आणि त्यांच्या आंदोलकांबद्दल अपशब्द वापरले, त्यांनी हे लक्ष्यात घ्यायला हवे.


याच वेळी दोन्ही उपमुख्यमंत्र्यांवर निशाणा साधताना, एकनाथ शिंदे आणि त्यांचे लोक, अजित पवार आणि त्यांचे लोक काल कुठे होते? ते त्या आनंद सोहळ्यात का सहभागी झाले नाही? की त्यांना हा आनंद सोहळा मान्यच नव्हता? की हे प्रकरण आणखी चिघळत रहावे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अडचणीत यावेत, अशी काही योजना दुसरे लोक करत होते का? हे काल प्रकर्षाने जानवले, असेही संजय राऊत म्हणाले.

## छगन भुजबळ कोर्टात जाणार

### मराठा आरक्षणासंदर्भातील शासन आदेशावर त्रिव नाराजी

विदर्भ प्रजासत्ताक
दि.३मुंबई

मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर गेल्या आठवड्याभरापासून आर्थिक राजधानी मुंबईतलं वातावरण तापलं होतं. मनोज जरांगे पाटील ठरल्याप्रमाणे मुंबईत दाखल झाले आणि आझाद मैदानावर बेमुदत उपोषणालाही बसले. यादरम्यान मुंबई उच्च न्यायालयाने त्यांना फटकारून मैदान रिकामं करण्याचे निर्देश दिले. त्याचदरम्यान राज्य सरकारने जरांगेंची आंदोलनस्थळी भेट घेऊन त्यांच्या काही मागण्या मान्य केल्याचं जाहीर केलं. मात्र, आता राज्य सरकारच्या या निर्णयावर सकारात्मक आणि नकारात्मक प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. त्यात खुद्द देवेंद्र फडणवीस यांच्याच मंत्रीमंडळातील सहकारी छगन भुजबळ यांनी विरोधी पवित्रा घेतला आहे. सरकारच्या जीआरविरोधात न्यायालयात जाण्याची तयारी भुजबळांनी केली आहे.



छगन भुजबळांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना मराठा आंदोलन आणि सरकारने मंगळवारी जारी केलेला शासन आदेश यासंदर्भात प्रतिक्रिया दिली. कालच्या जीआरबद्दल ओबीसींचे नेते व कार्यकर्त्यांच्या मनात अनेक शंका आहेत. आम्ही त्यावर विचार करतोय की यात नेमकं कोण हरलं आणि कोण जिंकलं? आम्ही या सगळ्यात वकिलांचा सल्ला घेत आहोत. याचा नेमका काय अर्थ आहे? कारण कोणत्याही जातीला उचलून दुसऱ्या जातीत टाकण्याचा अधिकार कोणत्याही सरकारला नाही. जात बदलता येत नाही, असं छगन भुजबळ म्हणाले.

दरम्यान, सरकारने मराठा आरक्षणासंदर्भात मंगळवारी जारी केलेल्या शासन आदेशासंदर्भात कोर्टात दाद मागणार असल्याचं छगन भुजबळांनी यावेळी स्पष्ट केलं. यासंदर्भात आम्ही न्यायालयात जाणार असून कायदेशीर मार्ग अवलंबणार आहोत, असं ते म्हणाले.

## मराठा आरक्षणावरून पाटलांमध्ये शब्दयुद्ध विनोद पाटलांना विखेंची झणझणीत टोलेबाजी

विदर्भ प्रजासत्ताक
दि.३मुंबई

राज्य सरकारने मनोज जरांगे यांच्या मागण्या मान्य करत त्यानुसार जीआर देखील काढण्यात आला आहे. परंतु, या जीआरचा टाचणी एवढाही फायदा किंवा उपयोग होणार नसून समाजाला यातून काहीही मिळणार नसल्याची टीका मराठा आरक्षण याचिकाकर्ते विनोद पाटील यांनी केली आहे. यावर मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटलांनी पत्रकार परिषद घेत स्पष्टीकरण दिले आहे. तसेच यावेळी बोलताना विखे पाटलांनी विनोद पाटलांवर टीका देखील केली आहे.

राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले, मराठा समाजातील लोकांनी मतभेद व्यक्त केले आहेत. आरक्षणाचा संघर्ष मजबूत होण्यापेक्षा दरीत गेला. आता सरकारने एक पाऊल पुढे टाकले आहे. पुढे कसे जाईल हे बघितले पाहिजे. हे मिळाले नाही ते मिळाले नाही. वेगवेगळे मतप्रवाह निर्माण करुन काय मिळणार? असा सवाल राधाकृष्ण विखे पाटील यांनी उपस्थित केला. तसेच आरक्षणावर चर्चा सुरु होती तेव्हा



विनोद पाटील ताजमध्ये झोपले होते, अशी टीका देखील विखे पाटलांनी केली आहे.

पुढे बोलताना राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले, आरक्षणाचा १६ टक्क्यांचा निर्णय सर्वोच्च न्यायालयापर्यंत टिकला होता. मात्र, महाविकास आघाडीने ते टिकवले नाही. लोकांनी त्यांना उघडे पाडायला पाहिजे होते. मात्र, असे घडलेले दिसत नाही. पुन्हा महायुती आल्याने १० टक्के आरक्षण दिले आणि अजूनही ते आरक्षण टिकून आहे. तसेच विचारवंतांनी आता शांत बसावे, अंमलबजावणी करण्यात मदत करावी, असाही विखे पाटलांनी टोला लगावला आहे.

## संपादकीय ......

# जरांगे पुन्हा जिंकले

मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे, ही मागणी घेऊन गेल्या पाच दिवसांपासून मुंबईतील आझाद मैदानात ठाण मांडून बसलेले मनोज जरांगे यांचे आंदोलन यशस्वी झाले, असे म्हणायला हरकत नाही. मराठा समाजाला सरसकट कुणबी जातप्रमाणपत्र द्यावे, या प्रमुख मागणीसाठी जरांगे यांचे हे आंदोलन होते. त्यांच्या पाच दिवसांच्या उपोषणानंतर मराठवाड्यातील मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र मिळण्यासाठी हैदराबाद गॅझेट अंमलबजावणीला शासनाने मान्यता दिली आहे. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्त्वातील शिष्टमंडळाने जरांगे यांच्या मागण्यांवर मागील चार दिवस अभ्यास केला. कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा हे जात प्रमाणपत्र कसे देता येईल यावर राज्य सरकारने मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमिती गठित केलेली आहे. या समितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील आहेत.

मनोज जरांगे यांनी चार महिन्यांपूर्वी मुंबईत आंदोलन करणार असल्याचे सरकारला कळवूनसुद्धा विखे पाटील यांच्या अध्यक्षतेतील उपसमितीची पहिली बैठक जरांगे मुंबईत दाखल झाल्यानंतर झाली. यावरुनच उपसमितीचे या प्रश्नासंबंधीचे गांभीर्य लक्षात येते. उपसमितीच्या बैठकीला राज्याचे महाधिवक्ता, न्या. शिंदे समितीचे अध्यक्ष न्यायमूर्ती (निवृत्त) संदीप शिंदे आणि मंत्रिमंडळातील इतर मंत्री उपस्थित राहात होते. मनोज जरांगे यांच्या पाच दिवसांच्या उपोषण आंदोलनानंतर मंत्रिमंडळ उपसमिती मंगळवारी एक मसुदा घेऊन आली. त्यावर मनोज जरांगे यांनी आझाद मैदानात खुली चर्चा करुन या मुसद्याला मान्यता देत सरकारने मागण्या मान्य केल्या आणि आपण आरक्षणाची लढाई जिंकलो असे जाहीर केले.

मराठा समाजाला सरसकट कुणबी जात दाखले देण्याच्या त्यांच्या मागणीवर सरकारने हा मुद्दा किचकट असल्याचे सांगत त्यासाठी एक महिन्याची मुदत मागितली. या मुख्य मागणीला जरांगे पाटील यांनी एक महिन्याची नाही तर दोन महिन्यांची मुदत देतो, असा दिलदारपणा दाखवला आहे. सगेसोयरे हा एक त्यांच्या प्रमुख आठ मागण्यांमधील महत्त्वाचा मुद्दा राहिलेला आहे. त्यावर आठ लाख हरकती आल्या आहेत. त्याचा आढावा घेतल्याशिवाय त्यावर निर्णय घेता येणार नाही, हेही सरकारच्यावतीने प्रस्ताव घेऊन आलेले विखे पाटील यांनी स्पष्ट केले. त्यामुळे मराठा आणि कुणबी हे एकच असा जीआर काही तातडीने निघणार नाही, हे पुन्हा एकदा स्पष्ट झाले. यामुळे ओबीसीमधून मराठा आरक्षणाचा प्रश्नही त्यांनी सोडवला. मनोज जरांगे २०२४ मध्येही मुंबईवर चाल करुन आले होते. तेव्हा त्यांना राजधानीच्या वेशीवरच थांबवण्यात तत्कालीन सरकारला यश आले होते. नवी मुंबईतील वाशी येथे स्वत: तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गेले आणि त्यांनी सगेसोयरे संबंधीचा प्रश्न सोडवणार असे पत्र दिले होते. तेव्हाही मनोज जरांगे यांनी आरक्षणाची लढाई आपण जिंकली असे जाहीर करुन परतीचा मार्ग धरला होता. आता पुन्हा एकदा मनोज जरांगे जिंकले आहेत. यावेळी ते राज्याच्या राजधानीत येऊन जिंकले. देशाच्या आर्थिक राजधानीत त्यांनी विजयाचे तोरण बांधले आहे.

मनोज जरांगे यांचे हे आठवे उपोषण होते, मात्र मुंबईतील पहिलेच. आठ हा आकडा आपल्याकडे तसा विशेषच. त्यादृष्टीनेही त्यांचे हे उपोषण महत्त्वाचे. जरांगे यांनी शुक्रवारी उपोषणाला सुरुवात केली. श्री गणरायाचे आगमन होऊन दोन दिवस झालेले आणि तिसर्या दिवशी दक्षिण मुंबई आंदोलकांनी जाम केली. रस्त्यावर अन्न शिजवणे, भोजन, आंघोळ आणि बरेच काही सुरू होते. सोमवारी मंत्रालय, महापालिका, न्यायालय आणि इतर शासकीय, निमशासकीय, खासगी कार्यालयात पोहोचणेही कर्मचार्यांना अवघड होऊन बसले. जहांगिर आर्ट गॅलरीत आंदोलकांनी जी कला दाखवली तीही न्यायालयाच्या नजरेतून सुटली नाही. आज अनेक मैदानी खेळ शहरी भागातून नामशेष होत असताना ग्रामीण भागातून आलेल्या या आंदोलकांनी सीएसएमटी आणि इतर सार्वजनिक ठिकाणी खेळून अनेकांना नॉस्टॅल्जिक केले. आंदोलकांची सीएसएमटी, मुंबई महापालिका, उच्च न्यायालय आणि इतर न्यायालये, चर्चगेट, मरीन ड्राइव्ह या परिसरात चाललेली हुल्लडबाजी पाहून मुंबई उच्च न्यायालयाने पाचव्या दिवशी प्रचंड रोष व्यक्त केला. दुपारी तीनपर्यंत मुंबई पूर्वपदावर आणण्याचे निर्देश न्यायालयाने दिले. त्यानंतर सरकारकडूनही जरांगेंच्या मागण्यांवर सकारात्मक पाऊले उचलली जाऊ लागली. गेल्या चार दिवसांच्या जोरबैठकींचे सार आज हैदराबाद गॅझेटच्या निमित्ताने समोर आले. मनोज जरांगे यांनी सरसकट शब्दाला बाजूला काढले आणि त्यांच्या मागण्यांवर तोडगा निघाला. त्यांच्या आठ मागण्यांपैकी सहा मागण्यांवर विखे पाटलांनी त्यांचे समाधान केले आणि पाच दिवस पाण्यावर काढल्यानंतर लिंबू सरबत देऊन उपोषण सोडवले.मुंबई शॉपिंग

उपोषण आंदोलन अहिंसक असल्याचे सर्वसामान्यांना वाटत असले तरी मनोज जरांगे यांचे उपोषण हे मुंबईकरांना गेल्या चार-पाच दिवसात अतिशय त्रासदायक ठरले. भारतातील अनेक दार्शनिक आणि तत्ववेत्त्यांनी उपोषणाने काहीही साध्य होत नाही, हे सिद्ध करुन दाखवले आहे. उपोषण हे अहिंसक कसे असू शकते असेही प्रश्न भारतीय ज्ञानवंतांनी उपस्थित केले आहेत. ज्यामध्ये एखाद्या जीवाची बाजी लावली जाते ती बाब अहिंसक कशी म्हणता येईल, असा त्यांचा युक्तिवाद राहिलेला आहे. आता मनोज जरांगे आणि त्याआधी अण्णा हजारे यांनी उपोषणाने सरकारला झुकवलेलं आहे. महात्मा गांधींनी लोकशाही मार्गाने करावयाच्या आंदोलनातील एक शस्त्र, आयुध म्हणून त्याचा वापर केला होता. मात्र सांप्रत काळात या आयुधाचा वापर करुन आंदोलनं हिंसक होत असतील तर न्यायव्यवस्थेला हस्तक्षेप करावा लागेल, हा धडाही पुन्हा जिंकलेल्या जरांगेंच्या आंदोलनाने दिला आहे.

# भात, नागली, वरई, खुरासणीसाठी कृषी सल्ला




**दि.३विदर्भ प्रजासत्ताक** -सध्या नाशिक जिल्ह्यातील बहुतांश भागात पावसाची रिपरिप सुरूच आहे. अशा परिस्थितीत शेतामध्ये पाणी साचून राहत आहे. दुसरीकडे भात, नागली, वरई, खुरासणी ही पिके वाढीच्या अवस्थेत आहे. अशावेळी काय उपाय योजना कराव्यात, हे समजून घेऊयात...




**खरीप भात (वाढीची अवस्था /फुटवे फुटणेची अवस्था)**

भात शेतातील जास्तीचे पाणी काढून टाकावे व पाण्याची पातळी ३ ते ५ सेमी पर्यंत ठेवावी.

सद्यस्थितीत भात पिकावर पाने खाणाऱ्या अळीचा (स्थानिक भाषेत टाक्या) प्रादुर्भाव दिसून आल्यास सायपरमेथ्रीन ०.५ मिली किंवा क्विनालफॉस १.५ मि.ली. प्रति लिटर पाण्यातून फवारणी करावी.

नत्रयुक्त खते प्रमाणापेक्षा जास्त टाकू नयेत, अन्यथा करपा रोगाचे प्रमाण वाढते.

पाणी व्यवस्थापन : भात पिकाच्या योग्य वाढीकरिता व अधिक उत्पादनाकरीता भात खाचरात पाण्याची योग्य पातळी राखणे आवश्यक आहे.

पिकाच्या वाढीच्या अवस्थेनुसार भात खाचरातील पाण्याची पातळी पुढीलप्रमाणे असावी.

खाचरात पिकाच्या योग्य वाढीसाठी रोपांच्या अधिक फुटव्याच्या अवस्थेत पाण्याची पातळी ३ ते ५ सेमी असावी.

खरीप नाचणी व वरई (वाढीची अवस्था /फुटवे फुटणेची अवस्था)

नाचणी पिकावरील पाने खाणारी अळीसाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून बांधावरील गवत व तण उपटून नष्ट करावे.

आंतरमशागत : एक कोळपणी व एक खुरपणी करावी. एक कोळपणी २० ते २५ दिवसांनी करावी. एक खुरपणी ४५ ते ६० दिवसांनी करावी.

खुरासणी (वाढीची अवस्था / आंतरमशागत)

पावसाचा अंदाज लक्ष्यात घेता खुरासणी पिकाची पेरणी नंतर ५० दिवसांनी शेंडा खुडावा. त्यामुळे झाडावरील फांद्यांची संख्या वाढून उत्पादनात वाढ होईल. तसेच खुरासणी पिकात पाने खाणारी अळी आढळून आल्यास क्लोरोपायरीफॉस २ मिली प्रती लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

(घाट क्षेत्रात जोरदार पावसाचा अंदाज लक्ष्यात घेता वरील सर्व कामे प्रसारित केलेल्या दिवसाकरिता स्थगित कराव्यात किंवा पढील चार दिवस पढे ढकलावीत.)

**- ग्रामीण कृषी मौसम सेवा आणि विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी**

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०




## भारतीयांना जाणवते या पोषकतत्वांची कमतरता, वाचा यासाठी काय खावे

**दि.३विदर्भ प्रजासत्ताक**


देशात १ ते ७ सप्टेंबर दरम्यान 'नॅशनल न्यूट्रीशन वीक' अर्थात 'राष्ट्रीय पोषण सप्ताहा'चे आयोजन केले जाते. अन्न आणि पोषण मंडळाने १९८२ मध्ये सुरू केलेल्या या उपक्रमाचा उद्देश लोकांमध्ये पोषण आणि आरोग्यदायी आहाराबद्दल जागरूकता निर्माण करणे तसेच मुलांमधील वाढत्या कुपोषणाचे प्रमाण कमी करण्याबद्दल लोकांमध्ये जनजागृती करणे आहे. या सप्ताहात विविध कार्यक्रम आणि उपक्रमांद्वारे योग्य आणि संतुलित आहाराचे महत्त्व पटवून दिले जाते, ज्यामध्ये शरीराला आवश्यक पोषक तत्वे, जीवनसत्त्वे आणि खनिजे यांचा समावेश असतो.

राष्ट्रीय पोषण सप्ताहाच्या निमित्ताने आज आपण अशी पोषकतत्वे पाहूयात, ज्यांच्या कमतरतेमुळे भारतीयांना सर्वात जास्त त्रास होतो. तसेच जाणून घेऊयात यांची कमतरता कोणत्या पदार्थांची भरून काढता येईल.

**लोह** -रक्त तयार होण्यासाठी आणि शरीर एक्टिव्ह राहण्यासाठी लोह खूप गरजेचे असते. भारतात विशेष करून महिलांमध्ये लोहाची कमतरता दिसून येते. जर तुम्हाला वारंवार थकवा जाणवत असेल तर शरीरात लोहाची कमतरता जाणवते, हे समजून घ्यावे.

**काय खाल?** आहारात मटण, मासे, चिकन, हिरव्या पालेभाज्या, ड्रायफ्रुट्सचा समावेश करावा.

**व्हिटॅमिन बी १२** - व्हिटॅमिन बी १२ लाल रक्तपेशींचे उत्पादन, ऊर्जा वाढवणे, फॅट्स आणि कार्बोहायड्रेट्स पचवणे आणि




मज्जासंस्था निरोगी ठेवण्याचे काम करते. जर शरीरात व्हिटॅमिन बी १२ नसेल तर तुम्हाला थकवा, अशक्तपणा किंवा मज्जातंतूशी संबंधित समस्या होऊ शकतात.

**काय खाल?**

मासे, मांस, अंडी आणि दुग्धजन्य पदार्थ

**प्रोटिन्स** - प्रोटिन्सची आवश्यकता तुमच्या वजनानुसार असते. जर शरीरात प्रोटिन्सची कमतरता असेल तर थकवा, कमकुवतपणा जाणवू शकतो.

अंडी, मासे, चिकन, दुग्धजन्य पदार्थ, डाळी, सुकामेवा

**फोलेट** - लाल रक्तपेशी, डीएनए आणि आरएनए निर्मितीसाठी फोलेट आवश्यक आहे. हे विशेषत: मुले आणि गर्भवती महिलांसाठी महत्वाचे असते.

हिरव्या पालेभाज्या, राजमा, बीन्स, अंडी

# वन्यप्राण्यांनी शेतीचं नुकसान केल्यास मिळणार भरपाई

**दि.३विदर्भ प्रजासत्ताक**

पावसानंतर शेतात तरारलेल्या पिकांवर वन्यप्राण्यांच्या कळपांचे हल्ले वाढले आहेत. हे प्राणी केवळ पिकांची नासधूस करत नाहीत, तर प्रसंगी ते शेतकऱ्यांवरही हल्ला हल करतात. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना मिळणारी नुकसान भरपाई दिलासा देणारी ठरत आहे.

अलीकडे वन्यप्राण्यांमुळे शेतीचे नुकसान होण्याचे प्रमाण वाढत चाललं आहे. शिवाय काही ठिकाणी पशुधनावर हल्लाही झाल्याच्या घटना घडल्या आहेत. पशुधनाचा मृत्यूही झाला आहे. अशावेळी संबंधित कुटुंबासाठी नुकसानभरपाई दिली जाते. यासाठी ऑनलाइन अर्ज करावा लागतो.

अलीकडे वन्यप्राण्यांमुळे शेतीचे नुकसान होण्याचे प्रमाण वाढत चाललं आहे. शिवाय काही ठिकाणी पशुधनावर हल्लाही झाल्याच्या घटना घडल्या आहेत. पशुधनाचा मृत्यूही झाला आहे. अशावेळी संबंधित कुटुंबासाठी नुकसानभरपाई दिली जाते. यासाठी ऑनलाइन अर्ज करावा लागतो.

**पिकांच्या नुकसानीसाठी किती मदत ?** वन्यप्राण्यांमुळे झालेल्या नुकसानीसाठी सरकारकडून आर्थिक मदत दिली जाते. त्यात कोरडवाहू पिकांसाठी प्रतिहेक्टरी १८ हजार रुपये, बागायती पिकांसाठी प्रतिहेक्टरी २५ हजार, तर फळबागांसाठी प्रतिहेक्टरी ५० हजार रुपयांची मदत दोन हेक्टर क्षेत्रासाठी दिली जाते.

**कुठे आणि कशी मागायची दाद ?**वन्यप्राण्यांकडून पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांनी




तत्काळ वनविभागाशी संपर्क साधावा. नुकसानीची माहिती मिळाल्यावर वनविभागाचे अधिकारी आणि कर्मचारी शेताची पाहणी करतात. शेतकरी, वनकर्मचारी आणि तलाठी यांच्या उपस्थितीत पंचनामा केला जातो. पंचनामा पूर्ण झाल्यावर, शेतकऱ्याच्या बँक खात्यात थेट नुकसानभरपाई जमा केली जाते.

**हल्ल्यात मृत्यू झाल्यास २५ लाखांची मदत-** वन्यप्राण्याच्या हल्ल्यात एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यास, सरकारकडून त्याच्या कुटुंबाला २५ लाख रुपयांची मदत दिली जाते. व्यक्ती गंभीर जखमी झाल्यास ५ लाख आणि किरकोळ जखमी झाल्यास ५० हजार रुपयांपर्यंत मदत दिली जाते.

वन्यप्राण्यांच्या हल्ल्यामुळे होणारे नुकसान रोखण्यासाठी आम्ही शेतकऱ्यांबरोबर काम करत आहोत. शेतकऱ्यांनी तत्काळ वनविभागाला माहिती द्यावी म्हणजे आम्ही पंचनामा करू आणि त्यांना लवकरात लवकर भरपाई मिळवून देऊ.

उपवनसंरक्षक, वनविभाग.

शेतकऱ्यांनी आपल्या पिकांची काळजी घ्यावी. जर जंगली प्राण्यांकडून नुकसान झाले असेल तर त्यांनी वेळ न घालवता वनविभागाशी संपर्क साधावा.

**जिल्हा कृषी अधीक्षक**

# पुरामुळे राजुरवाडी परिसरात हाहाकार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३मोर्शी :-** तालुक्यातील राजुरवाडी परिसरात सोमवार १ सप्टेंबर रोजी रात्री ७वाजतापासून ते सकाळी ४ वाजेपर्यंत सतत ९ तास झालेल्या मुसळधार पावसामुळे नदी-नाल्याला महापूर येऊन घरी गाढ झोपी असलेल्या नागरिकांच्या घरापर्यंत पाणी शिरले. जिकडे तिकडे पाणीच पाणी झाल्यामुळे मोठा हाहाकार उडाला.

महापुराचे पाणी लोकांच्या घरात टोंगळ्यापर्यंत शिरल्यामुळे पूर्णतः जनजीवन विस्कळीत झाले. मंगळवार २ सप्टेंबर रोजी पुन्हा ११ वाजतापासून पाणी सुरूच असल्याने नागरिकांना घरातून निघणे कठीण झाले आहे. जमीन खरडून जाऊन उभी पिके उध्वस्त झाली आहे. राजुरवाडी, कमळापूर, शिरलस, कवठाळ, निंभारणी यासह अनेक गावातील



शेतकयांच्या पिकांचे मोठे नुकसान झाले. अनेक ठिकाणी शेती पाण्याखाली गेल्याने शेतकरीआर्थिक संकटात सापडला आहे.

मोर्शी तालुक्यातील, राजूरवाडी, कवठाळ, भांबोरा, तुळजापूर, निंबारणी, कमळापूर, शिरूर, शिरलस या गावातील गदाभुकी नदी व सांड नाल्याला पूर येऊन गावातील घरात पाणी शिरले. नदी-नाल्याकाठचे शेत १०० टक्के पिकासहित खरडून गेले आहे.

# विशेष पथकाच्या माध्यमातून तपास मोहिम

## वीज पुरवठा खंडित करूनही बिल न भरणारे ग्राहक रडारवर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती,**

महावितरणच्या अमरावती आणि यवतमाळ जिल्ह्यातील ४० हजारापेक्षा जास्त वीज ग्राहकांचा ४५ कोटी रूपयाच्या वीज बिलाच्या थकबाकीसाठी वीज पुरवठा खंडित करण्यात आला आहे.परंतू ३७ हजारापेक्षा जास्त ग्राहकांचा वीज पुरवठा खंडित करण्यात आला याला दोन महिन्यापेक्षा जास्त कालावधी होवूनही या ग्राहकांनी वीज बिलाचा भरणा केलेला नाही. ग्राहक विजेशिवाय कसा राहू शकतो याची खात्री करण्यासाठी विशेष पथकाच्या माध्यमातून या ग्राहकांची तपासणी करण्यात येणार आहे.

महावितरणकडून वारंवार विनंती पाठ पुरावा करण्यात आल्यानंतरही वीज ग्राहकांचा चालू अथवा थकीत बिल भरण्यात प्रतिसाद न मिळाल्याने परिमंडलातील ४० हजार ७३७ वीज ग्राहकांचा ४५ कोटी ८० लाख रूपयाच्या थकीत बिलासाठी वीज पुरवठा खंडित करण्यात आला आहे.यामध्ये अमरावती जिल्ह्यातील १३ हजार ३४३ ग्राहकाचा समावेश असून त्यांच्याकडे १२ कोटी ८० लाख रूपयाचे वीज बिल थकीत आहे.यवतमाळ जिल्ह्यातील २७ हजार ३९४ ग्राहकांचा ३३ कोटी रूपयाच्या थकबाकीसाठी वीज पुरवठा खंडित करण्यात आला आहे.

**वीज चोरी आढळल्यास होणार फौजदारी:-**

वीजे शिवाय जगण्याची कल्पना करणे आजच्या घडीला शक्य नाही असे असतांना ग्राहक वीजेशिवाय कसे राहू शकतात. त्यामुळे अशा ग्राहकांची तपासणी करण्यासाठी महावितरणने यासाठी महावितरण परिमंडळ कार्यालयांकडून विभागानुसार वेगवेगळी विशेष पथके कार्यरत केली आहेत.




वाढलेल्या थकबाकीमुळे आर्थीक अडचणीचा सामना करणाऱ्या महावितरणकडून वसूलीसाठी सर्वच स्तरातून प्रयत्न केले जात आहे. त्यामुळे सरप्राईज चेकींग दरम्यान वीज ग्राहकांकडे वीज पुरवठा सुरू असल्याचे आढळल्यास त्यांच्यावर वीज कायदा २००३ अंतर्गत वीज चोरीच्या विविध कलमान्वये फौजदारी दाखल करण्यात येणार आहे.

**शेजारधर्म पाळतांना कायदा हातात घेवू नये:-**

अनाधिकृत वीज देऊन शेजारधर्म पाळणाऱ्यांवरही विद्युत कायदाअंतर्गत वीज चोरीचा गुन्हा दाखल करण्याची तरतूद कायद्यात करण्यात आली आहे.त्यामुळे शेजाऱ्यांनी आपण कायद्याचे उलंघंन तर करत नाही ना ? याची काळजी घेणे गरजेचे आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

Scan this QR code using the WhatsApp camera to join this group
क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

बुधवार दि. ३ सप्टेंबर २०२५ शहर/ग्रामिण

# उद्याला प्रभाग रचना होणार घोषित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

अमरावती महानगर पालिका निवडणुकीसाठी प्रभाग रचना ४ सप्टेंबर रोजी घोषित होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. प्रशासनाने तशा प्रकारच्या तयारी केली असून या प्रभाग रचनेवर ९ सप्टेंबरपर्यंत आक्षेप व सूचना मागविण्यात येतील.



२२ प्रभागांची रचना अबाधित ठेवून गेल्या महिन्यात महापालिकेने नवीन आराखडा तयार केला होता. महापालिका आयुक्तांनी स्थापन केलेल्या ८ सदस्यीय समितीने या आराखड्यावर स्वाक्षरी करून त्यावर अंतिम शिक्कामोर्तब केले आहे. हा आराखडा २५ ऑगस्ट रोजीच महापालिका विभागाला पाठवण्यात आला. आता तो ३ सप्टेंबर रोजी नगरविकास विभागाकडून जाहीर केला जाईल. ८ सप्टेंबरपर्यंत नागरिकांकडून हरकती आणि सूचना मागवल्या जातील. २२ सप्टेंबरपर्यंत जिल्हा दंडाधिकाऱ्यांच्या सुनावणीद्वारे अंतिम प्रभाग रचना जाहीर केली जाईल.

प्रस्ताव महापालिकेची प्रभाग रचना अंतिम करण्यासाठी दिलेला कालावधी समाप्त झाला आहे. म्हणजेच गेल्या महिन्यात गुरुवार, ७ ऑगस्ट रोजी महानगरपालिका प्रशासनाने विभागांच्या रचनेचा नगरविकास विभागाकडे पाठवला होता. त्यानंतर ८ ते १२ ऑगस्ट या कालावधीत हे प्रस्ताव पाठविण्यात आले आणि १३ ऑगस्ट रोजी प्रभागांच्या रचनेचा प्रस्ताव नगरविकास विभागाने राज्य निवडणूक आयोगाकडे पाठवला. २३ सप्टेंबर रोजी राज्य निवडणूक आयोगाकडून या मसुद्याला अंतिम मान्यता दिली जाईल. ४ ते ७ सप्टेंबर या कालावधीत प्रभागांची रचना प्रकाशित केली जाईल आणि त्यावर माहिती आणि तक्रारी घेतल्या जातील. ९ ते १८ सप्टेंबर या कालावधीत जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी घोषित केलेले अधिकारी प्राप्त माहिती ऐकतील. माहिती ऐकून आणि त्यावर कार्यवाही केल्यानंतर, १९ ते २२ सप्टेंबर या कालावधीत, प्रभागांच्या रचनेचा प्रारूप राज्य निवडणूक आयोगाकडून पुन्हा अंतिम मंजुरीसाठी पाठवला जाईल.म्हणजेच डिसेंबरनंतर दिवाळीनंतरच नागरी संस्थांच्या निवडणुका होतील अशी घोषणा करण्यात आली आहे. त्यामुळे आगामी महानगर पालिका निवडणुका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत अमरावती शहरासह संपूर्ण राज्यात राजकीय हालचाली तीव्र झाल्या आहेत. गेल्या महिन्यात ७ ऑगस्ट रोजी महानगरपालिकेने राज्याच्या नगरविकास विभागाला विभागीय रचनेचे प्रस्ताव सादर केले. आता ३ सप्टेंबर रोजी सरकारकडून विभागीय रचनेची घोषणा केली जाणार आहे, ज्यामुळे राजकीय पक्षांचे नेते आणि अधिकारी आणि विभागीय रचनेसाठी उत्सुक असलेल्या आणि संभाव्य निवडणुकांमध्ये रस असलेल्यांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. सर्वोच्च न्यायालयाने राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ४ महिन्यांत घेण्याचे आदेश दिलेले आहेत. त्यामुळे महापालिकेकडून तयारी सुरू करण्यात आली आहे.

### इच्छुकांमध्ये उत्सुकता

नगरविकास विभागाच्या वतीने राज्य निवडणूक आयोगाला अंतिम प्रभाग रचना सादर करतील. त्यानंतर निवडणूक आयुक्त अंतिम प्रभाग रचना मंजूर करतील, मंजुरी मिळताच ९ ऑक्टोबर रोजी अधिसूचना जारी केली जाईल. काही दिवसांपूर्वी शहराला भेट देणाऱ्या राज्य निवडणूक आयोगाने हे स्पष्टपणे सांगितले होते.

# तहसील कार्यालय की रेतीच्या गाड्यांचे गॅरेज?

## नागरिकांचा संतप्त सवाल



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३वरूड–** तहसील कार्यालय हे नागरिकांच्या कामकाजाचे प्रमुख केंद्र, पण गेल्या काही दिवसांपासून कार्यालय परिसर हा रेतीच्या जप्त गाड्यांनी गच्च भरून गेला आहे. प्रशासनाने बेकायदेशीर रेती उत्खननाविरुद्ध कारवाई करून जप्त केलेल्या ट्रक, ट्रॅक्टर व डंपर या थेट तहसील कार्यालयात आणून उभे केले आहेत. त्यामुळे कार्यालयात येणाऱ्या सामान्य नागरिकांना प्रचंड गैरसोयींना सामोरे जावे लागत आहे.नागरिकांचा सवाल आहे की – तहसील कार्यालय हे लोकांचे हक्काचे ठिकाण की जप्त गाड्यांचे गॅरेज? कार्यालयात दररोज शेकडो शेतकरी, महिला, वृद्ध, विद्यार्थी विविध कामांसाठी येतात. मात्र कार्यालय गेटपासून आतपर्यंत रेतीच्या गाड्यांची रांग लागल्याने पायवाट देखील अडवली गेली आहे. यामुळे वाहनांची वर्दळ, पायी जाणाऱ्यांची चेंगराचेंगरीसारखी स्थिती निर्माण होत आहे. याबाबत काही नागरिकांनी संताप व्यक्त केला. कारवाई करणे योग्य आहे, पण जप्त वाहने ठेवण्याकरिता स्वतंत्र मैदानी जागा अथवा पोलिस ठाण्याजवळील मैदानाचा वापर करायला हवा. तहसील कार्यालया च्या अंगणात गाड्या लावल्यामुळे नागरिकांना प्रशासनाकडे कामे करण्यासाठी त्रास होतोय. महिला व वृद्धांना उभ्या गाड्यांमधून वाट काढून आत यावे लागते. अपघाताची शक्यता ही नाकारता येत नाही, असे नागरिकांनी स्पष्ट केले.

तहसील प्रशासनाने या गंभीर बाबीकडे तातडीने लक्ष देऊन नागरिकांचा त्रास कमी करणे गरजेचे आहे. स्वतंत्र जागेचा पर्याय शोधून जप्त वाहनांची तात्पुरती व्यवस्था केल्याशिवाय या समस्येचे निराकरण होणार नाही. अन्यथा, कार्यालय की गॅरेज? हा सवाल अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.

# अमरावती रेल्वे स्थानक बंद होण्याची अफवा

## रेल्वे प्रशासनाकडून अफवांचे खंडन

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.३अमरावती :** रेल्वे साखळी उड्डाणपूल बंद अवस्थेत असल्यामुळे या मार्गावरील वाहतूक पूर्णतः बंद आहे. यादरम्यान शहरात विविध चर्चांना उधाण आले आहे. यामध्ये अमरावती रेल्वे स्थानक बंद होणार असल्याची अफवा जोर धरू लागली आहे. परंतु रेल्वे अधिकाऱ्यांनी अमरावती रेल्वे स्थानक बंद होणार नसल्याचे स्पष्ट केले आहे.



अमरावती रेल्वे उड्डाणपूल खराब झाल्यामुळे गत रविवारी २४ तारखेला मध्यरात्री वाहतुकीसाठी पूर्णपणे बंद करण्यात आला होता. यामुळे रेल्वे स्थानक, हमालपुरा येथून जयस्तंभ चौक व राजकमल चौकाकडे जाणारी सर्व वाहतूक बंद करण्यात आली होती. याशिवाय राजकमल चौक व जयस्तंभ चौक येथून येणारी सर्व वाहतूक देखील बंद झाली आहे. रेल्वे उड्डाण पुलाचे गडर खराब झाले असून काही ठिकाणी जंग चढल्याचा अहवालत्यामुळे महिनाभरापूर्वी रेल्वे उड्डाणपूलावरून जड वाहतुकींना वाहतुकीसाठी बंदी घालण्यात आली होती. यानंतर २४ तारखेला रेल्वे उड्डाणपुलावरूनवरील सर्व प्रकारची वाहतूक थांबवण्यात आली होती.सध्या रेल्वे उड्डाण पुलावरून सर्व प्रकारची वाहतूक बंद आहे. यामुळेशहरातील वाहतुकीचा मोठा खोळंबा होत आहे. सणासुदीच्या काळामध्ये शहरात वाहतुकीची कोंडी होत असतानाच आता अमरावती रेल्वे स्थान बंद होणार असल्याची अफवा सुरू झाली आहे. मात्र रेल्वे अधिकाऱ्यांनी अमरावती रेल्वे स्थानकावरून रेल्वे गाड्या नियमितपणे सुटणार असून व या ठिकाणी गाड्या देखील येणार असल्याचे स्पष्ट केले आहे. खराब अवस्थेतील उड्डाणपुलाखाली गाड्यांना उभे करण्यात येऊ नये, याबाबत देखील काळजी घेतली जात असल्याचे बोलल्या जात आहे.–

# रविवारी चंद्रग्रहण; साडेतीन तास चंद्र पृथ्वीच्या छायेत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती :**

चंद्र पृथ्वीभोवती आणि पृथ्वी सूर्याभोवती फिरताना जेव्हा एका रेषेत येतात, तेव्हा निसर्गातील सावल्यांचा खेळ अर्थात ग्रहण स्थिती निर्माण होते. ही स्थिती ७ सप्टेंबर रोजी निर्माण होणार असून चंद्र सुमारे साडेतीन तास पृथ्वीच्या छायेत राहणार आहे. त्यामुळे खगोलप्रेमींना चंद्रग्रहणाचा आनंद घेता येणार आहे.

चालू वर्षात प्रत्येकी दोन अशी चार ग्रहणे आहेत.यापैकी फक्त एकच ग्रहण आपल्या भागात मात्र रविवारी खंडग्रास चंद्रग्रहण बघता येईल. या आधीचे १४ व २९ मार्चला झालेले चंद्र-सूर्य ग्रहण, तसेच येणाऱ्या अमावस्येला होणारे सूर्यग्रहण आपल्या भागात बघता येणार नाही.भाद्रपद शुध्द पौर्णिमेला रात्री ९.५७ वाजता आपल्या डाव्या बाजूकडून चंद्रबिंब पृथ्वीच्या सावलीत येताना ग्राहणाला सुरुवात होईल.



# दर्यापूर-अमरावती व दर्यापूर-मुर्तीजापूर

## मार्गावर पथदिवे नसल्याने अपघाताचे प्रमाण वाढले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३दर्यापूर :३०**

गेल्या अनेक वर्षापासून दर्यापूर-अमरावती रोड व दर्यापूर-मुर्तीजापूर रोड हा पथदिव्याविनाच असल्याने दिवत्ताकाठी अपघाताची मालिका सुरूच आहे. दर्यापूरअमरावती मार्ग व मुर्तीजापूर मार्ग हा अंधारमय असल्याने येथील नागरिकांना मोठ्या संकटांना सामोरे जावे लागत आहे.

शहरातील नागरिक आपला नियमित कर पालिकेला व संबंधित विभागाला अदा करीत असतात परंतु त्याच्या मोबदल्यात कुठलाही मोबदला हा मिळत नसल्याने शहरातील नागरिक हतबल झाले आहे. तरी या अति महत्त्वाकांक्षी बाबीची दखल संबंधित विभागाने घेऊन तात्काळ दर्यापूर-अमरावती व दर्यापूर मुर्तीजापूर रोड लगतपथदिव्यांची निर्मिती करावी, असे जनमानसातून व्यक्त होत आहे.

# चाकूचा धाक दाखवून महिलेवर परप्रांतीयाचा अत्याचार

## मुलाकडून उकळले ९१.५० लाख

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती–** चाकूचा धाक दाखवून एका ४८ वर्षीय महिलेवर बलात्कार करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या महिलेच्या मुलाला कंपनीत संचालक बनविण्याचे आमिष दाखवून त्याच्याकडून ९१ लाख ५० हजार रुपये देखील आरोपीने उकळले. ही घटना राजापेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली. या प्रकरणी पीडित महिलेच्या तक्रारीवरून आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी या प्रकरणी तपास सुरू केला आहे.

राहुल संतोषकुमार सिंह (४६, रा. नंदनवन, औरंगाबाद, मथुरा, उत्तर प्रदेश) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. पीडित ४८ वर्षीय महिलेने स्वेच्छानिवृत्ती घेतली आहे. त्या स्थानिक स्वराज्य संस्थेत नोकरीला होत्या. त्यांचा मुलगा हा चार वर्षांपूर्वी एका जिमला जात होता. त्यावेळी त्याची ओळख राहुल सिंह याच्यासोबत झाली. दोघांत संवाद सुरू झाल्यावर महिलेच्या मुलाने राहुलला आपल्या घरी नेले. त्यावेळी मुलाने महिला व त्यांच्या पतीची ओळख राहुलसोबत करुन दिली. दरम्यान, ३ ऑक्टोबर २०२४ रोजी महिलेचा मुलगा व राहुल असे दोघे बँकाकला गेले. तेथे राहुलने महिलेच्या मुलाला कंपनीमध्ये संचालक बनविण्याचे अमिष दाखविले. त्यामुळे महिलेच्या मुलाने राहुलला ९१ लाख ५० हजार रुपये दिले.महिला व त्यांचे पती हे राहुलला वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासोबतच पैसे परत कधी करणार, याबाबत विचारणा करण्यासाठी त्याच्या खोलीवर गेले. खोलीमध्ये गेल्यावर महिलेच्या पतीला फोन आल्याने ते बाहेर निघून गेले. त्यावेळी राहुल हा पीडित महिलेजवळ गेला. त्याने वाईट उद्देशाने त्यांच्या शरीराला स्पर्श केला. त्याचवेळी त्याने जवळील चाकू काढून महिलेच्या गळ्याला लावला. खोलीचे दार आतून बंद करुन त्याने महिलेसोबत जबरीने शारीरिक संबंध प्रस्थापित केले. याबाबत मुलगा व पतीला काही सांगितल्यास त्यांचा खून करेन, अशी धमकीसुद्धा त्याने महिलेला दिली. त्यानंतर एक दिवस पीडित महिला, त्यांचा मुलगा व राहुल असे तिघे शेत पाहण्याकरिता गेले होते. त्यावेळीही संधी साधून राहुलने पीडित महिलेसोबत असभ्य वर्तन करून त्यांच्या विनयभंग केला. त्यांना चाकूचा धाक दाखविला. याबाबत कुणाला काहीही सांगितल्यास तुझ्या मुलाला जिवाने मारुन टाकेन, अशी धमकीसुद्धा त्याने त्यांना दिली. या प्रकरणी पीडित महिलेच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी राहुलविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.




# अंजनसिंगी-मंगरूळ राज्य मार्गाची दुरवस्था

## खड्डे उखडलेल्या डांबरीकरणामुळे प्रवाशांचा जीव धोक्यात

**विद्दर्भ प्रजासत्ताक**
**दि.३ धा.रेल्वे–** धामणगाव रेल्वे येथील अंजनसिंगी ते मंगरूळला जोडणाऱ्या राज्य मार्गाची स्थिती अत्यंत खराब झाली आहे. या मार्गावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून डांबरीकरण उखडले आहे.

या मार्गावरून दररोज शेकडो शेतकरी, विद्यार्थी आणि नोकरदार वर्ग प्रवास करतो. विशेषतः दुचाकीस्वारांना या रस्त्यावरून प्रवास करणे धोकादायक ठरत आहे. आतापर्यंत अनेक दुचाकीस्वार या रस्त्यावर अपघातग्रस्त होऊन जखमी झाले आहेत.

शिदोडी येथील तालुका काँग्रेस कमिटीचे सचिव शैलेश निस्ताने यांनी सांगितले की राज्य मार्ग असूनही प्रशासनाचे याकडे पूर्णपणे दुर्लक्ष झाले आहे. अधिवक्ता महल्ले यांनी सरकारवर टीका करताना म्हटले की श्रीमंतांसाठी मोठे महामार्ग बांधले जात आहेत. मात्र सर्वसामान्यांच्या वापरातील रस्त्यांकडे दुर्लक्ष केले जात आहे.नागरिकांनी या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी शासन आणि प्रशासनाकडे मागणी केली आहे. दुरुस्ती न झाल्यास आंदोलन करण्याचा इशाराही दिला आहे.



### समृद्धी, शक्तिपीठाकडे लक्ष, इकडे मात्र दुर्लक्ष

ग्रामीण भागाकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याची टीकादेखील नागरिकांकडून केली जात आहे. समृद्धी महामार्ग, शक्तिपीठ महामार्ग यांसारख्या भव्य योजनांना गती मिळत असताना ग्रामीण जनतेच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित अशा महत्त्वाच्या मार्गांची अवस्था मात्र दयनीय आहे.–

# मराठा आरक्षणाच्या जीआरचा टाचणीएवढाही उपयोग नाही – विनोद पाटील



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३मुंबई–** महाराष्ट्र सरकारने मनोज जरांगे पाटील यांना दिलेल्या जीआरचा टाचणीएवढाही फायदा आणि उपयोग होणार नाही असं स्पष्ट मत मराठा आरक्षण याचिकाकर्ते आणि आंदोलक विनोद पाटील यांनी व्यक्त केलं आहे. मराठा आरक्षण समितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी समोर येऊन या जीआरचा अर्थ समाजावून सांगावा अशीही मागणी विनोद पाटील यांनी केली आहे.राधाकृष्ण विखे पाटील यांनी जो जीआर दिला त्यात काय लिहिलंय? कुठल्याही व्यक्तीला आरक्षणाचा लाभ घ्यायचा असेल तर काय पुरावे लागतील? कुठलंही आरक्षण घ्यायचं असेल तर १९६७ पूर्वीचा पुरावा लागतो, त्याचा उल्लेख आहे. शेतमजूर आणि भूमिहीन असतील त्यांनी काय केलं पाहिजे याचा उल्लेख आहे. त्यासाठी गृह चौकशी अहवाल लागतो. तलाठ्यांनी तो द्यायचा आणि मग प्रमाणपत्र दिलं जातं. स्पष्टच सांगायचं झालं तर या जीआरचा टाचणीभरही फायदा किंवा उपयोग या कागदाचा नाही. मी ओबीसी नेत्यांना सांगतो आहे की ते या जीआरला आव्हान देणार आहेत. कदाचित कोर्ट त्यांचं प्रकरण दाखलही करुन घेणार नाही, कारण हा निर्णय नाहीच. ही फक्त प्रक्रिया आहे आणि ती कागदावर उतरवून दिली आहे. असं विनोद पाटील यांनी सांगितलं.पुढे विनोद पाटील म्हणाले, सरसकटची अपेक्षा आम्हाला होती. कुणबी म्हणून जो जन्माला आला तो त्याला कुणबी मराठा प्रमाणपत्र मिळेल. सातत्याने हैदराबाद गॅझेटचा उल्लेख केला जातो आहे. हे संस्थान जेव्हा भारतात विलीन झालं त्यावेळी जो करार झाला त्यात हैदराबाद पॅक्टमध्ये दोनच गोष्टी होत्या निजामाची संपत्ती सुरक्षित राहिल आणि सुख सोयी सुखरुप राहतील.

# चंद्रभागा नदीकाठी बाप्पांच्या विसर्जनाकरिता भक्तांना प्रशासनाने सोडले वाऱ्यावर

## जीवितहानी टाळण्याकरिता प्रशासनाचा कानाडोळा, विसर्जनावेळी नदीकाठी बंदोबस्ताची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३दर्यापूर-** राज्यामध्ये गणपती बाप्पा विराजमान झाले आहे. अशातच काही भाविक भक्त आपल्या घरी दीड दिवसाचे,अडीच दिवसाचे, पाच दिवसाचे, सात दिवसाचे तसेच दहा दिवसाचे व सार्वजनिक गणपती बाप्पा यांची स्थापना करतात, तत्पश्चात त्यांचं विसर्जन सुद्धा करतात. पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे नदी-नाले भरून वाहत आहे. अशातच बाप्पाचं विसर्जन नदीमध्ये करण्याचे म्हटलं तर खूप वेळा भाविक भक्तांना आपला जीव गमवावा लागला आहे. ज्यामुळे संबंधित प्रशासन बाप्पांचं विसर्जन करणाऱ्या ठिकाणी बंदोबस्त किंवा कर्मचारी तैनात करतात. मात्र दर्यापूर तालुक्यातील खल्लार गावामधाल्या एका भाविक भक्ताच्या घरी अडीच दिवसाकरिता गणपती बाप्पांची स्थापना करण्यात आली होती, त्यांच्या विसर्जनाकरिता भाविक भक्त चंद्रभागा नदीपात्रावरील पूल ओलांडून पलीकडे नदीकाठी आले होते, परंतु यावेळी संबंधित प्रशासनाचे एकही कर्मचारी बंदोबस्ता करिता किंवा मार्गदर्शनाकरिता या ठिकाणी दिसून आले नाही. एकीकडे या नदीवरील असलेल्या पुलाला दोन्हीकडून कसल्याच प्रकारचे बॅरिगेट्स नाही, ज्यामुळे पाय घसरून नदीमध्ये पडून वाहून जाण्याचा संकट मोठ्या प्रमाणात उभा ठाकत आहे. दुसरीकडे चंद्रभागा नदी दोन्ही काठ भरून वाहत आहे,अशातच विसर्जनाच्या वेळी विसर्जन



यात्रेत मुले, वृद्ध नागरिक सामील होते. मात्र संबंधित प्रशासनाकडून असली घोडचूक दिसून आल्यामुळे उर्वरित पुढील विसर्जनाच्या वेळी योग्य तो बंदोबस्त प्रशासनाने ठेवावा अशी मागणी परिसरातील नागरिक करीत आहे.

> खल्लार येथील लोखंडे यांच्या घरी अडीच दिवसाची गणपती स्थापना दरवर्षीप्रमाणे यावर्षी करण्यात आली होती,मात्र विसर्जनाच्या वेळेस नदीकाठी महसूल विभाग तसेच संबंधित प्रशासनाकडून कसल्याच प्रकारचा बंदोबस्त ठेवण्यात आलेला नव्हता, ज्यामुळे आता होणाऱ्या उर्वरित विसर्जना करिता प्रशासनाने बंदोबस्त ठेवावा ज्यामुळे कुठल्याही प्रकारची जीवित हानी होऊ नये अशी प्रशासनाकडे मागणी करतो.
>
> **महेश कुरळकर.** काँग्रेस सामाजिक कार्यकर्ते

# माधान ला पुन्हा पावसाने झोडपले



## चांदूरबाजार तालुक्यात मध्यरात्रीच्या पावसाने पुन्हा केले जनजीवन विस्कळित

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३चांदुर बाजार**

चांदूरबाजार तालुक्यात १सप्टेंबरला मध्यरात्री झालेल्या ब्राम्हणवाडा महसूल मंडळातील पावसाने पुन्हा एकदा पुराचे पाणी घरात घुसल्याने माधान गावातील जनजीवन विस्कळीत झाले असल्याने मध्यरात्रीच्या पुराने जीवनावश्यक वस्तू वाहून गेल्याने नागरिक भयभीत झाले आहे.

या अगोदर तालुक्यात १५ ऑगस्ट रोजी झालेल्या ढगफुटी सदृश्य झालेल्या पावसाने परिसरातील नाल्याना महापूर आला असता त्यामध्ये जसापूर, दिलालपूर, कोदोरी, चांदूर बाजार, गुलजार पेठ, शिरजगाव बंड, जमापूर येथील जनजीवन विस्कळीत झाले होते. असे असताना पुन्हा १५ दिवसांच्या नंतर १ सप्टेंबरच्या मध्यरात्री झालेल्या पावसाने माधानसह आजूबाजूच्या गावानादेखील नाल्याला पूर आल्याने जनजीवन विस्कळित झाले असल्याचे दिसून आले पुन्हा एकदा पंधरा दिवसानंतर पावसाने ढगफुटी परिस्थितीमुळे माधान गावातील नागरिकांचे मोठ्याप्रमाणात नुकसान झाले असून नागरिक व शेतकऱ्यामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.माधान परिसरात पुरामुळे घर, झोपडधा, धान्य व शेतीचे मोठे नुकसान झाले असून शेतकऱ्याचे उभे पीक पाण्याखाली आले असल्याने शेतकयांचे आर्थिकनुकसान झाले आहे. त्यामुळे प्रशासनाकडून १ सप्टेंबरला पुरामुळे नुकसान झालेल्या नक व शेतकऱ्यांचे तत्काळ पंचनामे करून मदत जाहीर करण्यात यावी. गावामध्ये शेतकयांच्या घरामध्ये पाणी शिरल्याने काही नागरिकांच्या घराची पडक झाली, तर तसेच ब्राम्हणवाडा महसूल चादूरबाजार महसूल मंडलातील शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे महकमाधान व शिरजगाव बड, जमापूर गावात झालेल्या पावसाने नात्यांना पूर येऊन पुराचे पाणी गावात शिरल्याने गावातील नागरिक मध्यरात्रीच्या सुमारास झालेल्या पावसाने भयभीत झाले असून आपला जीव वाचवण्याचा प्रयत्न केला. १ सप्टेंबरच्या मध्यरात्रीच्या पावसाच्या पाण्याचे या परिसरातील शेतकऱ्यांचे व नागरिकाचेसुद्धा मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे.

> एक सप्टेंबरला मध्यरात्रीच्या सुमारास ब्राह्मणवाडा महसूल मंडळात जवळपास ७१ मिलिमीटर पाऊस झाला असल्याने त्या पावसामुळे गावात काही नुकसान झालेले असल्यास त्या नुकसानाची पंचनामे करण्याकरिता गाव पातळीवरील तलाठी यांना आदेशित केले आहे.
>
> **लक्ष्मीकांत तिवारी तहसीलदार**, चांदूरबाजार

# नांदगाव खंडेश्वरमध्ये शेतकरी महिलेची आत्महत्या

## नापिकी आणि कर्जबाजारीपणामुळे विष प्राशन, अख्खे गाव हळहळले

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३नांदगाव खंडेश्वर**



नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील वेणी गणेशपूर गावात महिला शेतकरी ज्योत्स्ना भोयर यांनी विष प्राशन करून आत्महत्या केली. नापिकी व कर्जबाजारीपणा यामुळे त्यांनी हा टोकाचा निर्णय घेतला. त्यांच्या आत्महत्येमुळे अख्खे गाव हळहळले असून परिसरात शोककळा पसरली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार गेल्या काही वर्षांपासून त्यांच्या शेतात सतत नापिकी होत असल्याचे कुटुंबीयांचे म्हणणे आहे. शिवाय शेतमालाला योग्य असा हमीभाव न मिळाल्याने झालेल्या उत्पादनातूनही त्यांना पुरेसे उत्पन्न मिळत नव्हते. त्यामुळे त्या नेहमी विवंचनेत रहायच्या. त्यांच्या पतीचे गेल्या १६-१७ वर्षांपूर्वीच निधन झाले. त्यांना शुभम व गौरव नावाची २२ आणि १८ वर्षे वयाची दोन मुले आहेत. शेतीत राबून कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवणे, हेच त्यांचे मूळ काम होते. परंतु तेच अडचणीत आल्याने त्या हवालदील झाल्या होत्या. शेतीतील उत्पन्न समाधानकारक नसल्याने त्या कर्जाची परतफेडही वेळेवर करु शकल्या नाहीत. त्यांच्या नावावर शासकीय यंत्रणा व खाजगी बँकांचे मिळून २ लाख ९० हजार रुपयांचे कर्ज आहे.

या सर्व कारणांमुळे त्या तीव्र मानसिक तणावाखाली होत्या.पतीचे निधन झाल्याने संपूर्ण घराची जबाबदारी त्यांच्या खांद्यावरच होती. दोन्ही मुले आणि त्यांच्या शिक्षणाची व संगोपनाची जबाबदारीही त्यांच्यावरच होती. या सर्व विवंचनेला कंटाळून त्यांनी राहत्या घरी विष प्राशन करून जीवनयात्रा संपवली. ही घटना उघडकीस आल्यानंतर ग्रामस्थ व शेतकरी वर्गातून तीव्र दुःख व्यक्त केले जात आहे. दरम्यान. गावकऱ्यांनी या घटनेबद्दल तीव्र दु:ख व्यक्त केले असून शेतमालाला हमीभाव व कर्ज माफी देण्याची मागणी सरकारकडे रेटली आहे. याशिवाय महिला शेतकऱ्यांसाठी विशेष सहाय्य योजना लागू करण्यात यावी, जेणेकरुन भविष्यात अशा हृदयद्रावक घटना घडणार नाहीत, अशी अपेक्षा देखील या निमित्ताने व्यक्त होत आहे.

# मुलीला भेटायला गेलेले आई-वडील गेले वाहून

सिंगरवाडीतील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३पुसद-** शहरापासून २२ किलोमीटर अंतरावर असलेल्या सिंगरवाडी येथून मुलीला भेटायला गेलेले आई-वडील पुराच्या पाण्यात गेले वाहून गेले आहेत. गावकऱ्यांमार्फत शोधमोहीम सुरू आहे. ही दुर्दैवी घटना सोमवारी दि. १ सप्टेंबर रोजी रात्री ७ वाजताच्या दरम्यान घडली होती. महिलेचा मृतदेह दि. २ सप्टेंबरला रात्री २ वाजताच्या दरम्यान शोध मोहीम दरम्यान सापडला आहे. मोहन सकरू राठोड (वय ५५) वर्ष व त्यांची पत्नी सुलोचना मोहन राठोड (वय ४७) वर्ष हे दोघे वाहून गेले होते.

या प्रकरणी प्राप्त माहितीनुसार, पुसद तालुक्यातील सिंगरवाडी येथील मोहन राठोड यांची मुलगी पुसद तालुक्यातील भंडारी येथे राहते. तिला भेटण्यासाठी दि. १ सप्टेंबरला रात्री मुसळधार सुरू असलेल्या पावसात त्यांची दुचाकी हिरो स्प्लेंडर वाहन क्रमांक एमएच-२९-क्यु - ६९३० ने ते सिंगरवाडी या गावावरून निघाले होते. त्यांनी सिंगरवाडी - धानोरा गावाला जोडणारा पूल पार केला होता. परंतु समोरच्या दुसऱ्या नाल्याच्या पुलावरून पाणी वाहत असल्यामुळे दुचाकीने मोहन राठोड व त्यांची पत्नी सुलोचना हे परतले. परंतु परत आल्यानंतर त्यांना असे दिसले कि धानोरा - सिंगरवाडी या पुलावरून सुद्धा पाणी वाहत आहे. हाच पूल पार करताना पाण्याच्या प्रवाहामुळे मोहन राठोड व त्यांची पत्नी दुचाकीसह पाण्याच्या प्रवाहात



वाहून गेलेले :- मोहन सकरू राठोड व त्यांची पत्नी

वाहून गेले. घडलेल्या घटनेची संपूर्ण माहिती सिंगरवाडी येथील गावकऱ्यांमार्फत मिळालेली आहे. गावाला जोडणाऱ्या पुलावरून दोन व्यक्ती वाहून गेल्याची माहिती सिंगरवाडी येथील गावकऱ्यांना होताच, त्यांनी शोध घेतला. मोहन राठोड यांचा शोध सुरू या दरम्यान त्यांना मोहन व त्यांची पत्नी सुलोचना ज्या दुचाकीने मुलीकडे निघाले होते. ती दुचाकी पुलाच्या खालच्या भागात काही अंतरावर आढळून आली. ती दुचाकी गावातील काही तरुणांमार्फत बाहेर काढण्यात आली. नंतर ग्रामीण पोलिस ठाण्याचे कर्मचारी व अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी दाखल झाले होते. दुसऱ्या दिवशी दि. २ सप्टेंबर रात्री २ वाजताच्या सुमारास सुलोचनाचा मृतदेह सापडला आहे. मात्र, मोहन राठोड यांचा अद्यापही शोध लागला नाही.

# पिण्याच्या पाण्याची, रब्बीतील सिंचनाची काळजी मिटली

## समाधानकारक पाऊस; शेतकऱ्यांना दिलासा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अकोला-** यंदा आतापर्यंत झालेल्या ५६३.९ मि.मी. पावसामुळे सिंचन प्रकल्प भरले असून, नागरिकांची पिण्याच्या पाण्याची आणि शेतकऱ्यांची रब्बी हंगामातील सिंचनाची काळजी मिटली आहे. पाटबंधारे विभागाकडून व्यवस्थित नियोजन झाल्यास रब्बी हंगामात शेतकऱ्यांनी पुरेसे पाणी पिकांना देता येणार आहे. सरासरी साठा ९२ टक्के झाला आहे.यंदा मे महिन्याच्या अखेरीस तूफान पाऊस झाला. मात्र ७ जूनपासून सुरु झालेल्या मान्सूनच्या प्रारंभी पावसाची प्रगती फारशी झाली



नाही. मृग नक्षत्रात पावसाने पाठ फिरवली. परिणामी अनेकांची चिंता वाढली. मात्र, जूनच्या अखेरीस पावसाने धुव्वाधार बॅटिंग केली. त्यामुळे जून महिन्याच्या अखेरीस १५५.८ मि.मी. पावसाची नोंद झाली. हा पाऊस सरासरीच्या ११३.८ टक्के होता. गतवर्षी जून महिन्यात हेच प्रमाण १३९ मिमी (सरासरीच्या १०१.५ टक्के) होते. पावसात खंड पडल्याने जुलैअखेरपर्यंत कमी होता साठा जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात मध्यम स्वरुपाचा पाऊस पडला. मात्र दुसऱ्या आठवड्यात चार दिवस संततधार पाऊ सुरू होता. पावसात खंड पडला. सिंचन प्रकल्पात सुद्धा मुबलक पाणी जमा होऊ शकले नाही. परिणामी जुलै अखेरपर्यंत सिंचन प्रकल्प तहानलेले होते पाणी सोडण्याबाबतची बैठकच वादात सापडली होती. त्यामुळे आता यंदा कसे नियोजन होते, हे पाहणे औत्सुक्याचे राहणार आहे.

# मेळघाट आरोग्य परिक्रमेतील पहिल्या शिबिरात २०७ रुग्णांची तपासणी

## मेळघाटात ५६ शिबिरे घेण्यात येणार

**विदर्भ प्रजासत्ताकदि.३ धारणी**

अमरावती पाठकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निर्देशानुसार मेळघाट आरोग्य परिक्रमा अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत मेळघाटातील गावांमध्ये ५६ आरोग्य शिबिर घेण्यात येणार आहे. या शिबिरात सोनोग्राफी, एक्स-रेसह औषधोपचार मोफत देण्यात येत आहे. अभियानातील चिखलदरा येथील पहिल्या शिबिरात २०७ हाणांची तपासणी करण्यात आली.मेळघाट परिसरात या अभियानांतर्गत ३० मे पासून आरोग्य शिबिर अभियान राबविण्यात येत आहे. यातील चिखलदरा येथे शिबिरात २०८ रुग्णांची तपासणी करण्यात आली या शिबिरात गर्भवती माता, वृद्ध, बालके, महिलांनी आरोग्य चिकित्सेचा लाभ घेतला शिबिरात स्त्रीरोग विभाग ७१,



अति जोखमीच्या माता ५२,स्तनदा माता ११, बालरोग ४१. नेत्ररोग ३९, असंसर्गजन्य रोग ४८. ईसीजी १९, मोतीबिंदू ९, शस्त्रक्रिया ७. हृदयरोग २. मधुमेह २. तसेच जिल्हास्तरावर तातडीची उपाययोजना करणे आवश्यक आहे, अशा रुग्णाची तपासणी करण्यात आली. ५२ रुग्णांची सोनोग्राफी करण्यात आली. यातील २४ रुग्णांना संदर्भित करण्यात आले आहे. मेळघाटातील आदिवासीची सर्वकष आरोग्य तपासणी करण्यासाठी जिल्हा वार्षिक योजनेतून मेळघाट आरोग्य परिक्रमा अभियान राबविण्यात येत आहे.

# काळ्या पाषाणातील गणेश मूर्ती ठरते लक्षवेधक

## अकोटचे रघुजी भोसले कालीन प्राचीन सिद्धिविनायक मंदिर; अठराव्या शतकात निर्मिती

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अकोट-** शहरातील सोमवारवेस भागातील अठराव्या शतकात रघुजी भोसले यांनी बांधलेले सिद्धिविनायक मंदिर आहे. आजही शहराच्या पुरातन इतिहासाची साक्ष हे मंदिर देत आहे. गणेशमूर्ती ही डाव्या सोंडेची असते. परंतु, या मंदिरातील काळ्या पाषाणातील ही गणेशमूर्ती उजव्या सोंडेची आहे.

नागपूर सुभ्याचा कारभार सांभाळणारे रघुजी भोसले यांनी अठराव्या शतकात अकोट येथील सोमवारवेस येथे सिद्धिविनायक मंदिर बांधले होते. यासंदर्भात एक आख्यायिका आहे ती अशी, १७५१ मध्ये रघुजी भोसले हे कर आणि शेतसारा वसुलीसाठी अकोट परिसरात आले होते. निजामाला त्याची चाहूल लागताच त्याने रघुजी भोसलेंवर हल्ला केला. अकोटातील सोमवारवेस भागात रघुजी भोसले यांचा हत्तीखाना, घोडपागा आणि सैन्याची एक तुकडी होती. निजामाच्या अचानक हल्ल्यामुळे रघुजी भोसले यांनी या हत्तीखान्यात आश्रय घेतला, त्यामुळे त्यांचे प्राण वाचले. त्यादिवशी संकष्ट चतुर्थी होती. गणेशानेच हत्तीच्या रूपात आपले प्राण वाचवले म्हणून त्यांनी या ठिकाणी सिद्धिविनायकाचे मंदिर बांधले, असे सांगितले जाते. अकोट परिसरातील अडगाव-सिरसोली येथे सन १८०२ मध्ये इंग्रज आणि मराठ्यांचे युद्ध झाले होते. त्यासाठी ती भोसले हे अकोट परिसरात आले होते. तशी शासकीय नोंद देखील अकोला डिस्ट्रिक्ट गॅझेटिअरमध्ये आहे. सिद्धिविनायक मंदिराबरोबरच भोसल्यांनी अकोट शहरात आणखी दोन गणेश मंदिराची बांधणी केल्याचे सांगितले जाते. नरसिंग महाराज मंदिराजवळ डाव्या सोंडेची प्राचीन गणपती मंदिर आहे. तर तिसरे गणपती मंदिर परकीय आक्रमणात नष्ट झाल्याचे भाविक सांगतात. सिद्धिविनायक मंदिरात दरवर्षी गणेश जयंती अत्यंत उत्सवात साजरी केली जाते. महाप्रसादाचे आयोजन केले जाते.

शेंदुराने माखली होती मूर्ती या मंदिरातील मूर्तीचे रूप शेंदूराने माखले होते. मूर्ती ही पूर्वी शेंदुरचर्चित भला मोठा तांदळा होता. मात्र, फेब्रुवारी २००१ मध्ये शेंदुराचा हा थर निखळल्याचे सांगितले जाते. त्या शेंदुराच्या लेपाखाली



सिद्धिविनायकाची मूर्ती शाबूत दिसून आली. अतिशय सुंदर, मनमोहक, रेखीव, कोरीव आणि उजव्या सोंडेच्या गणेशमूर्तीचे हे मूळरूप अनेक वर्ष थराखाली झाकलेले होते. साडेचार फूट उंच, ३ फूट रुंद अशी काळ्या पाषाणातील ही चतुर्भुज मूर्ती आहे. सिंहासनावर आरूढ मूर्तीच्या डोक्यावर नागदेवता आहे.

# जामगावचा लोकनेता गेला

## अरुण राऊत वाघोडकर यांच्या निधनाने गाव पोरकं झालं



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३वरूड**

गावाचा आवाज, गावाचा आधारस्तंभ आणि गावाच्या प्रगतीसाठी झटणारा खरा नेता अरुण राऊत वाघोडकर आज आपल्यात नाहीत. हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने त्यांची अकस्मात प्राणज्योत मालवली आणि संपूर्ण जामगाव अवाक झाले.

जामगावात जेव्हा त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार पार पडले, तेव्हा शेकडो अनुयायी, समर्थक आणि ग्रामस्थांनी अश्रुपूर्ण डोळ्यांनी शेवटचा निरोप दिला. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर एकच प्रश्न होता.

**गावाचा लढवय्या आता कोण?**

गावातील राजकीय वाटचालीत त्यांची जमेची बाजू होती - ठाम भूमिका घेण्याची ताकद आणि ग्रामविकासासाठी अहोरात्र झटण्याची वृत्ती. कुणाचंही दुःख आपलं मानून धावून जाणारा, साधा सरळ स्वभाव, कार्यकर्त्यांना खंबीर साथ देणारा नेता म्हणून त्यांची वेगळी ओळख होती.अरुण राऊत वाघोडकर यांच्या जाण्याने जामगावने केवळ एक कार्यकर्ता गमावलेला नाही, तर एक दिशा देणारा मार्गदर्शक गमावला आहे. राजकीय समीकरणांना मोठा धक्का बसला असून, गाव पोरकं झाल्याची भावना सर्वत्र व्यक्त होत आहे.गावासाठी जगला, गावासाठी झटला आणि गावासाठीच प्राण अर्पण केला अशी आठवण त्यांच्या अनुयायांच्या मनात कायम राहील.

# सेवानिवृत्त शिक्षक वाऱ्यावर प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष

## पेन्शन, उपदान, गटविमा अडकला; न्यायालयात जाण्याची शिक्षकांची तयारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

अमरावती जिल्हा परिषद शिक्षण विभागामार्फत सेवानिवृत्त झालेल्या शेकडो शिक्षकांना आजही त्यांच्या सेवानिवृत्तीच्या लाभासाठी संघर्ष करावा लागत आहे. वेतन निश्चितीतील त्रुटी, सेवापुस्तकातील अपूर्ण नोंदी, पेन्शनप्रक्रियेतील विलंब, आणि गटविमा न मिळाल्याने हे शिक्षक अक्षरशः वाऱ्यावर असल्याचे चित्र समोर आले आहे.

सेवानिवृत्तीनंतर चार-पाच महिने पेन्शन मिळालेली नाही, असे अनेक शिक्षकांनी सांगितले. ऋझऋ, अंशदान व उपदानाची रक्कमही विलंबाने मिळत असून गटविमा आजही प्रलंबित आहे. सेवानिवृत्तीच्या वेळी वेतन निश्चिती करताना वारंवार सेवापुस्तक परत पाठवून त्रुट्या काढल्या गेल्या. त्यामुळे लाखो रुपयांची थकबाकी रखडली आहे.

**३ ते ७ लाखांचे नुकसान - शिक्षक न्यायालयात जाणार**

शिक्षकांच्या म्हणण्यानुसार, प्रत्येकी ३ ते ७ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. यापैकी काही शिक्षकांनी उच्च न्यायालयात जाऊन आपली थकबाकी वसूल केली आहे. मात्र अजूनही ६० ते ७० शिक्षकांना हक्काची रक्कम मिळालेली नाही.

सेवानिवृत्तीनंतर जबाबदाऱ्या संपत नाहीत. उलट कुटुंबाचा खर्च सुरूच असतो. अशा वेळी प्रशासनाकडून अशा प्रकारची अडवणूक ही छळवणुकीसारखीच आहे, असे शिक्षकांचे म्हणणे आहे.या पार्श्वभूमीवर सेवानिवृत्त शिक्षक संघटनांनी एकत्र येत न्यायालयात सामूहिक याचिका दाखल करण्याचा निर्णय घेतला आहे. माजी मुख्याध्यापक संभाजी रेवाळे यांनी सर्व सेवानिवृत्त शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख यांनी या लढ्यात सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे.



**सेवापुस्तक अद्यावत नाही, वैद्यकीय देयके प्रलंबित**

केवळ सेवानिवृत्त शिक्षकच नव्हे, तर सध्या कार्यरत असलेले अनेक शिक्षकही समस्यांनी ग्रस्त आहेत. सेवापुस्तकातील नोंदी अद्यावत नाहीत, सिकृत्या नाहीत, वैद्यकीय बिलांचे पैसे मिळालेले नाहीत. शासनाच्या स्पष्ट आदेशानंतरही शिक्षकांना पाच तारखेच्या आत वेतन मिळत नाही, ही आणखी एक गंभीर बाब आहे.

या सगळ्या परिस्थितीने शिक्षकांमध्ये प्रचंड अस्वस्थता आणि नाराजी आहे. शिक्षक संघटनांनी प्रशासनाकडे वेळोवेळी पाठपुरावा केला असून, तरीही ठोस कार्यवाही न झाल्यास आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

# शहापूर शाळेची जिल्हास्तरीय कुस्तीतील शौर्यगाथा

## लहानग्यांच्या घामातून उमलली मोठी स्वप्ने - विभागीय स्तराकडे विजयी झेप




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३वरूड**

मनात केवळ जिद्द, अंगात अथांग ताकद आणि डोळ्यांसमोर स्वप्न - अशी ओळख निर्माण करून शहापूर (मराठी) जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. दि. २ सप्टेंबर २०२५ रोजी अमरावती जिल्हा क्रीडा संकुलात क्रीडा व युवक सेवा संचालनालय, जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्पर्धेत या लहानग्यांनी घाम गाळून शौर्यगाथा लिहिली.

५० किलो गटात कुमारी नूतन सुनील उईके व ४६ किलो गटात कुमारी भाविका अमोल वाघमारे यांनी अभेद्य ताकदीच्या जोरावर विजेतेपद पटकावत थेट विभागीय पातळीवर मजल मारली. त्यांच्या या यशाने शाळा, गाव आणि पालकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू दाटले.त्याचप्रमाणे ३८ किलो गटात रौणक अनिल धुर्वे व ३५ किलो गटात मनीष हसनलाल उईके यांनी उपविजेतेपद मिळवून आपले कर्तृत्व सिद्ध केले. अपयशाच्या छायेतही या लहानग्यांची उमेद ढळली नाही, उलट त्यांच्या नजरेत आता पुढील यशाची चमक स्पष्ट दिसते.या यशामागे मार्गदर्शक कोच श्री. राम पांडे सर यांचे कठोर परिश्रम व अमूल्य मार्गदर्शन आहे. त्यांनी या खेळाडूंना फक्त कुस्तीचे धडेच दिले नाहीत, तर शिस्त, आत्मविश्वास आणि जिंकण्याची भूकही दिली. शाळेतील सर्व शिक्षक वृंदांचे पाठबळ या विजयी झेंड्याला मजबुती देणारे ठरले.आज या लहानग्यांनी मैदानात दाखवलेली धडाडी केवळ विजय नाही, तर एक प्रेरणा आहे की ग्रामीण भागातील मुलेही स्वप्न पाहू शकतात, संघर्ष करून ती जिंकू शकतात. विभागीय स्तरावर या बालवीरांकडून आणखी सुवर्ण यशाची अपेक्षा व्यक्त होत आहे.शहापूरच्या लहानग्यांची कुस्तीतील गर्जना गावाचेच नव्हे तर तालुक्याचे नाव अभिमानाने उज्ज्वल झाले!

# कोटमी गावातील मंजूर रस्त्याचे काम ठप्प



ग्रामपंचायत दहेंद्री अंतर्गत येणाऱ्या कोटमी येथे शासन-प्रशासनाकडून रस्त्याचे काम मंजूर असून ठेकेदार यांना वारंवार काम करण्यासाठी बोलले, पण हो करतो म्हणून काही दिवसांपासून टाळाटाळ करत आहे. रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले आहे. त्यामुळे गावातील नागरिकांना खूप त्रास सहन करावा लागत आहे. ये-जा करणाऱ्या नागरिकांना सुध्दा त्रास होत आहे. मी २५ ऑगस्ट २०२५ रोजी तहसीलदार चिखलदरा यांना विनंती अर्ज केला आहे. मंजूर असलेल्या कामासंबंधित ठेकेदार याच्यावर आपल्या स्तरावर योग्य ती कारवाई करून काम मार्गी लावण्यात यावे.

**रवी बेठेकर, उपसरपंच दहेंद्री**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३चिखलदरा**

ग्रामपंचायत दहेंद्री अंतर्गत येणाऱ्या कोटमी गावातील मंजूर रस्त्याचे काम ठेकेदाराकडून अद्यापही सुरू न केल्यामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. पावसाळ्यात रस्ता चिखलमय होऊन वाहतुकीस अडथळे निर्माण होत आहेत.

शाळकरी मुले, शेतकरी व रुग्णांना मोठ्या त्रासाला सामोरे आवे लागत आहे. या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी रवी बैठेकर, उपसरपंच दहेद्री यांनी तहसीलदार यांना निवेदन सादर केले आहे. मंजूर काम तातडीने सुरु करुन ठेकेदाराविरुद्ध आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी केली आहे. ग्रामस्थांचे म्हणणेआहे की, शासनाकडून रस्त्यासाठी निधी मंजूर असूनही कामाचा वेग न वाढवणे म्हणजे ग्रामविकासाच्या कामात अडथळानिर्माण करणे होय. त्यामुळे शासन व प्रशासनाने ठोस भूमिका घेऊन ठेकेदाराला जबाबदार धरणे आवश्यक आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, गावकऱ्यांना अनेक मूलभूत सुविधा अपुऱ्या आहेत आणि रस्ता हा दळणवळणाचा कणा असतानाही त्याकडे गंभीरपणे पाहिले जात नाही, काम तत्काळ सुरु झाले पाहिजे, कोटमी गावातील नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. गावकऱ्यांची अपेक्षा आहे की, तहसील प्रशासन व सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने कारवाई करून कोटमी गावाचा मंजूर रस्ता लवकरात लवकर पूर्ण करावा, जेणेकरून नागरिकाना दिलासा मिळेल.

# मृत्यू पावलेल्या होमगार्ड सैनिकाच्या कुटुंबीयाला पोलिसांची आर्थिक मदत

## होमगार्ड तुकाराम सावरकर यांचा नैसर्गिक मृत्यू,कुटुंबावर संकट ठाणेदार अवतारसिंग चव्हाण यांच्या हस्ते ५८१५० रू आर्थिक मदत



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३धारणी**

महाराष्ट्र पोलिसांना अनेक बंदोबस्त कार्यात मदत करणाऱ्यांसाठी पोलीस स्टेशन स्तरावर ग्रामीण भागातील युवकांना होमगार्ड सैनिक म्हणून नियुक्ती दिल्या जाते त्यांना शासनातर्फे मोजके मानधन देवून बंदोबस्त कामी घेतल्या जाते अशाच कार्यात सहभागी असलेले टेंबली येथील रहिवासी तुकाराम गंगाराम सावलकर हे मागील कित्येक दिवसापासून धारणी पोलीस स्टेशनमध्ये होमगार्ड सैनिक म्हणून काम करत होते या होमगार्ड सैनिकावर २२ ऑगस्ट २०२५ ला शुक्रवार रोजी अचानक संकट ओढावले त्यामध्ये त्यांचा राहत्या घरीच नैसर्गिक मृत्यू झाला. मृत्यू झाल्यानंतर त्याच्या कुटुंबाला शासनातर्फे कोणतीही मदत मिळाली नाही परंतु धारणी पोलिसांनी त्याच्या कार्याचां गौरव करत त्याच्या कुटुंबावर आलेल्या या संकटाला मात देण्यासाठी धारणी पोलीस स्टेशन चे ठाणेदार अवतारसिंग चव्हाण व सर्व पोलीस कर्मचाऱ्यांनी स्वतःच्या जवळील नगद राशी जमा करून एकूण ५८ हजार १५० रुपये संपूर्ण पोलीस स्टेशन कडून जमा केले व त्या होमगार्ड सैनिकाच्या पत्नी व मुले असलेल्या कुटुंबाला आर्थिक मदत म्हणून ठाणेदार अवतार सिंग चव्हाण, होमगार्डचे अधिकारी सूर्यकांत कस्तुरे, वाहतूक पोलीस कर्मचारी बंडू चक्रे, यांनी ती मदत राशी त्याच्या कुटुंबीयाला टेबली येथे त्याच्या मूळ गावी जाऊन दिली त्यामुळे त्या होमगार्ड सैनिकाच्या कुटुंबाला व त्याच्या मुलाच्या शिक्षणा करीता त्या नगद मदत राशीची नक्कीच मदत होईल अशी कुटुंबाकडून अशा व्यक्त करत पोलिसांनी केलेल्या मदतीच्या हाताला संवेदना व्यक्त केल्या.

# अंतोरा-ब्राम्हणवाडा भगत रस्ता अतिवृष्टीमुळे बंद

## शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३शिराळा**

शिराळा नजीकच्या अंतोरा-ब्राम्हणवाडा भगत मार्ग अतिवृष्टीमुळे बंद झाला, तसेच शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या दोन्ही गावाला जोडणारा रस्ता बंद पडला आहे. हा पूर्णतः उखडला आहे. मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने पुलावरून पाणी वाहत असल्यामुळे दोन्ही गावाची वाहतूक बंद आहे. या अगोदर ही ढगफुटीसदृश पाऊस झाल्याने पिकांचे नुकसान झाले आहे. याबाबत जिल्हाधिकारी व तहसीलदार अमरावती यांना निवेदन देण्यात आले आहे.

निवेदन देतेवेळी शंतनूनिचित, विलास गायकवाड, संजय निचित, हिंमतराव किटुकले, दिलीप राऊत, प्रदीप सवाई, प्रदीप निचित, मनोज धुमाळे, शरद किटुकले, माधव देशमुख, विलास गायकवाड, गजानन देशमुख, आकाश रामटेके, नितीन गायकवाड आदी उपस्थित होते.

# ५,९७९ लाभार्थ्यांकडे घरकुल बांधण्याकरिता जागाच नाही

## प्रशासनाकडून लाभार्थ्यांना जागेकरिता १५ सप्टेंबरची डेडलाइन; अन्यथा रद्द होईल घरकुल



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

अमरावती जिल्ह्यात पंतप्रधान आवास२ अंतर्गत मोठ्या प्रमाणात घरकुल मंजूर झाले आहेत. परंतु, यामध्ये ५ हजार ९७९ असे पात्र लाभार्थी आहेत की, ज्यांच्याकडे घरकुल बांधण्याकरिता जागाच नाही. त्यामुळे या लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करण्याकरिता १५ सप्टेंबरची डेडलाइन देण्यात आली आहे. अन्यथा त्यांचे घरकुल रद्द केले जाणार आहे.

केंद्र शासनाकडून जिल्ह्यात ६४ हजार ७३७घरकुल मंजूर झाले आहेत. यातील ६ हजार ७६८ मंजूर झाले असून ५० हजारांवर घरकुल प्रगतीपथावर आहेत. परंतु, जिल्ह्यात हजार ९७९ लाभार्थ्यांकडे घरकुल बांधण्याकरिता जागाच उपलब्ध नाही. याकरिता प्रशासनाकडून पात्र लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देण्याकरिता विविध उपक्रम राबविण्यात आले.

काहींनी अतिक्रमित जागा उपलब्ध करून दिल्या, काहींनी शेतामध्ये घर बांधण्याची संधी तर काहींना केवळ बक्षीस पत्रावर जागांची संधी देखील देण्यात आली. त्यानंतरही जिल्ह्यात ५ हजार ९७९ लाभार्थी १४ जागेविना आहेत. त्यामुळे या लाभार्थ्यांना आता त्यांच्या स्तरावर जागा उपलब्ध करण्याचे आवाहन करीत १५ सप्टेंबरची डेडलाइन देण्यात आली आहे. अन्यथा त्यांचे घरकुल रद्द केल्या जाणार आहे.

# चिंचोक्यांचा गणपती : अमरावतीच्या शिरजगाव, करजगावमध्ये ८६ वर्षांपासून होते अनोख्या मूर्तींची पूजा;आकर्षक मथळा सुचवा




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३शिरजगाव**

श्री गणरायाची भव्य आणि सुरेख मूर्ती आणि त्यासमोर हनुमान आणि गरुडदेवाची मूर्ती. श्री गणेशाचं हे स्वरुप चांदूरबाजार तालुक्यातल्या शिरजगाव आणि करजगाव या दोन्ही गावात पाहायला मिळतं. विशेष म्हणजे या दोन्ही मूर्ती चिंचोक्यांनी बनवल्या आहेत. गत ८६ वर्षांपासून गणेशोत्सवात या मूर्तींची मिरवणूक काढली जाते. 'नवसाला पावणारे मनाचे गणपती' अशी मान्यता या गणरायाला आहे. चिंचोक्यांपासून या दोन्ही मूर्ती कशा घडवण्यात आल्या.

स्वातंत्र्यपूर्व काळात, शिरजगाव येथील मूर्तिकार गंगाराम वांगे यांनी १५ सप्टेंबर १९३९ रोजी गणपतींसह हनुमान आणि गरुडदेवाची अतिशय देखणी मूर्ती साकारली. ही मूर्ती शिरजगाव येथील श्री राम मंदिरात स्थापन करण्यात आली. लगतच्या करजगाव येथील रजनी खेरडे या शिरजगावला बहिणीकडे आल्या असता, त्यांच्या नजरेत ही मूर्ती भरली. त्यांनी अशीच मूर्ती स्वतःसाठी बनवून मागितली. गंगाराम वांगे आणि त्यांचे शिष्य बळीराम कविटकर यांनी पुन्हा गणपती, हनुमान आणि गरुडदेवाची मूर्ती घडवली. ती मूर्ती रंजना खेरडे यांनी करजगावला नेली. सध्या ही मूर्ती करजगाव येथील श्री गजानन महाराज मंदिरात विराजमान आहे. गणेशोत्सवाच्या काळात या मूर्तीला गावाच्या चौकात सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या कार्यक्रमांत स्थापन करून मिरवणूक काढली जाते.गणपती, हनुमान आणि गरुडदेव या तिन्ही मूर्ती चिंचोक्यांच्या मूर्ती म्हणून प्रसिद्ध आहेत. १९३९ मध्ये मूर्तिकार गंगाराम वांगे यांनी चिंचेमध्ये असणारे हजारो चिंचोके एकत्र केले. या चिंचोक्यांबरोबर कागदाचे तुकडेही एकत्र करून त्यांचा कुटून लगदा तयार केला गेला.

या लगद्यात सरस, माती आणि ताग यांचा वापर करून मूर्तींचे विविध अवयव तयार करून एकत्र जोडण्यात आले. या मूर्ती वजनानं हलक्या असून सहजपणे मिरवणूक काढता येतात, अशी माहिती शिरजगाव येथील रहिवासी आणि मूर्तिकार अरुण गवळी यांनी सांगितले.

**अनंत चतुर्दशीच्या दिवशी निघते मिरवणूक**

शिरजगाव येथील श्री राम मंदिर आणि करजगाव येथील श्री गजानन महाराज मंदिराजवळील गणेशोत्सव मंडळातून अनंत चतुर्दशीच्या दिवशी भव्य मिरवणूक काढली जाते. मिरवणूक गावच्या वेशीपर्यंत जाते, जिथे नदीमध्ये उत्सवमूर्तींचे विसर्जन केले जाते. यानंतर, वाजत-गाजत चिंचोक्यांच्या या मूर्ती शिरजगावमधील श्री राम मंदिरात आणि करजगावमधील संत गजानन महाराज मंदिरात पुनःस्थापित केल्या जातात. चिंचोक्यांच्या या मूर्ती नवसाला पावतात, अशी श्रद्धा आणि विश्वास स्थानिक लोकांमध्ये आहे, असं शिरजगाव येथील सेवानिवृत्त शिक्षक पुंडलिक भुसारी यांनी सांगितलं.

# नोंदणी तर केली पण खरेदी केंव्हा हो साहेब!ज्वारी खरेदी कडे नफेड चे दुर्लक्ष



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३पथ्रोट**

नाफेडमार्फत ज्वारी खरेदी सुरूझाली असली, तरी अनेक नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांची ज्वारी अजूनही खरेदी झाली नसल्याची ओरड सुरू आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या ज्वारीचा साठा खराब होण्याची भीती व्यक्त होत असून, शासनाने तातडीने खरेदी सुरू करावी, अशी मागणी होत आहे.

उन्हाळी हंगामात शेतकऱ्यांनी ज्वारी खरेदीसाठी नाफेडकडे १३०० फार्म भरले होते. त्यापैकी ३४० फार्म ऑनलाईन झाले होते. परंतु, २४० शेतकयांचीच ज्वारी नाफेडने खरेदी केली. उरित शंभर शेतकऱ्यांना कोणताही संदेश किया खरेदीसंदर्भात माहिती मिळालेली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या संभ्रमाचा सामना करावा लागत आहे. मागील वर्षी नाफेडने २७००० क्विंटलची खरेदी केली होती. पण यावर्षी दहा हजार क्विंटलच्या आसपासच खरेदी झाली असून उर्वरित खरेदी केव्हा होणार, असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे.ज्वारी खरेदी न झाल्यामुळे शेतक-यांच्या घरात अजूनही मोठ्याप्रमाणावर ज्वारी साठवून ठेवलेली आहे. पावसाळ्यामुळे साठवणुकीत अडचणी येत असून, ज्वारी खराब होण्याचा धोका वाढला आहे. अशा परिस्थितीत तातडीने ज्वारी खरेदी सुरू करावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

# विष्णोरा येथे आरोग्य तपासणी शिबिर यशस्वीपणे संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३विष्णोरा**

प्राथमिक आरोग्य केंद्र, खेड अंतर्गत श्री गणेशा आरोग्याचा आरोग्य अभियान २०२५ या उपक्रमाअंतर्गत विष्णोरा येथील नवयुवक गणेश मंडळाच्या वतीने आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरास ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या शिबिरात नागरिकांची रक्तदाब, मधुमेह, ईसीजी, रक्त चाचणी, ए.एन.सी. तपासणी, तसेच आभा कार्ड व गोल्डन कार्ड नोंदणी करण्यात आली. याशिवाय हिवताप, डेंगू, चिकनगुनिया या आजारांबाबत माहिती व मार्गदर्शन देण्यात आले.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी नवयुवक गणेश मंडळाचे अध्यक्ष अंकुश लांडगे, तसेच निलेश कडू, सुरज पुंड, मनीष लांडगे, अतुल चरपे, शुभम रीठे, सार्थक ठाकरे, शिवा ठाकरे, यश लांडगे आणि मंडळाचे सर्व कार्यकर्ते यांचे मोलाचे सहकार्य लाभले. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद बेंडे, अमोल उगले, अजय सुंदरकर, तसेच आरोग्य आदी आरोग्य कर्मचारी उपस्थित होते.

# तिवसा रक्तरंजित! पूर्व वैमनस्यातून आई-मुलाची निर्घृण हत्या; आरोपी अटकेत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३तिवसा**

तिवसा तालुक्यातील अशोकनगर परिसरात एका थरारक हत्येची घटना आज सकाळी घडली. मागील वर्षी शेजाऱ्याच्या वडिलांची हत्या करणाऱ्या अमोल वसंत डाखोरे (वय ४०) याचा आज सकाळी चाकूने भोसकून खून करण्यात आला. विशेष म्हणजे ही हत्या त्याच्या आईसमोरच घडली, आणि आरोपीने अमोलच्या आईलाही चाकूने वार केलेत. सध्या त्या महिलांची प्रकृती गंभीर असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले.मात्र त्या ठिकाणी त्यांच्या दुर्दैवी मृत्यू






झाला .सुमारे बारा महिन्यांपूर्वी अमोल डाखोरेने शेजारी राहणाऱ्या एका व्यक्तीचा खून केला होता. त्या गुन्ह्यातून तो अलीकडेच, ८-१० दिवसांपूर्वी जेलमधून सुटून घरी परतला होता. याच घटनेचा बदला घेण्यासाठी शेजाऱ्याच्या मुलाने आज सकाळी अमोलवर चाकूने हल्ला केला.अमोलच्या घरात मागील दोन दिवसांपासून महालक्ष्मीच्या पूजेचा कार्यक्रम सुरु होता. आज सकाळी आरोपी चाकू घेऊन त्यांच्या घरात शिरला. घरातच काही धक्काबुक्की झाली आणि नंतर दोघे घराबाहेर आले. तेथे पुन्हा दोघांमध्ये जोरदार भांडण झाले. भांडणात आरोपीने अमोलवर सपासप वार केले. त्याला वाचवण्यासाठी मध्ये आलेल्या आईलाही चाकूचे घाव लागले.घटनेनंतर अमोलच्या आईला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून आईचा रुग्णालयात दुर्दैवी मृत्यू झाला. या थरारक घटनेमुळे अशोकनगरसह संपूर्ण तिवसा परिसरात एकच खळबळ उडाली आहे. हल्लेखोर आरोपी अद्याप फरार असून तिवसा पोलीस त्याचा शोध घेत आहेत.ही हत्या अमोलच्या शेजारी राहत असलेल्या 'अवझाड' कुटुंबाच्या मुलाने केल्याचे सांगितले जात आहे. तिवसा पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले असून आरोपीस पकडण्यासाठी शोधमोहीम सुरू आहे.पोलिसांनी या घटनेची गांभीर्याने दखल घेत तपास वेगाने सुरू केला आहे. ही हत्या फक्त कौटुंबिक वैमनस्य नाही, तर समाजमनाला हादरवणारी आहे.

# बोरगाव धर्माळे येथील सह. सोसायटीवर संतनगरी परिवर्तन शेतकरी पॅनलचा झेंडा; सर्व १३ जागा विजयी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३बोरगाव धर्माळे**

येथील सेवा सहकारी सोसायटीच्या निवडणुकीत 'संत नगरी परिवर्तन शेतकरी पॅनल' ने सर्व १३ जागांवर विजय मिळवित इतिहास रचला आहे. या पॅनलचे नेतृत्व पंचायत समितीचे माजी सभापती आशिष धर्माळे यांनी केले.

येथील सेवा सहकारी सोसायटीची निवडणुक शांततेच पार पडली. या निवडणुकीत संतनगरी परिवर्तन शेतकरी पॅनलचे प्रकाश शेषराव ठाकरे, कैलास शंकर भालेराव, विनोद आबाराव धर्माळे, किशोर विठ्ठल तायडे, आशिष पुंडलिक धर्माळे,किशोर शालिकराम मार्गदे, अमोल प्रकाश तसरे, भूषण अरुण धर्माळे, ज्योती बाव्यसाहेब धर्माळे, वंदना रमेश पाचघरे, विजय अण्णाजी मारोडकर, गुलाव रामराव मोहोड आणि दिलीप चंदुशिग चव्हाण विजयी झाले. विजयानंतर गावात जल्लोष साजरा करण्यात आला. आगामी काळात सहकारी सोसायटीच्या माध्यमातून कर्ज वितरण प्रक्रिया सुलभ करणे, शेतमालाला बाजारात योग्य दर मिळवून देणे, गोडाऊनसारख्या भौतिक सुविधा उभारणे, शेतीसाठी आवश्यक तांत्रिक सहकार्य पुरवणे आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी आधुनिक व्यवस्थापन राबवणे या क्षेत्रांवर भर देण्यात येणार असल्याचे आशिष धर्माळे यांनी सांगितले.

# नगराध्यक्षाच्या तिकिटासाठी गॉडफादरकडे लॉबिंग; इच्छुकांची गर्दी; मतदार संभ्रमात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अंजनगाव सुर्जी**

काही महिन्यावर येऊन ठेपलेल्या सर्वच राजकीय पक्षांमध्ये हालचालींना वेग आला आहे. सर्वच पक्षातील इच्छुकांनी नगराध्यक्ष पदासाठी तिकीट मिळविण्याकरिता मुंबांसह आपापल्या राजकीय गॉडफादरकडेवाऱ्या सुरू केल्या आहेत कुणाला कोणत्या पक्षाची उमेदवारी मिळते हे स्पष्ट नसल्याने मतदार व कार्यकर्ते संम्रभात आहेत.

नोहेंबर किंवा दिवाळीनंतर होणार नगरपालिकेची निवडणूक आहे. नगराध्यक्ष हे जनतेमधून निवडून दिले जात असल्यामुळे. सर्वच पक्षातील इच्छुकांनी नगराध्यक्ष पदाचे तिकीट मिळविण्याकरिता धावपळ सुरू केली आहे. काही इच्छुकांनी राजकीय गॉडफादरसह इतर महत्त्वाच्या व्यक्तीकडे फिल्डिंग लावण्याकरिता वाऱ्या सुरू केल्या पक्षाकडून उमेदवारी जाहीर न आहेत. तसेच कोणत्याही राजकीयझाल्यामुळे व कोणाची युती कोणासोबत हे अद्याप कळलेले नाही. नगराध्यक्षपदाची आरक्षण सोडत सुद्धा अजून न निघाल्यामुळे मतदारांमध्ये चर्चा शहराच्या गल्ली बोळात व संभ्रम असून राजकीय समीकरणाची चौकाचौकात रंगल्या आहेत. काही उत्साही कार्यकर्ते भूतकाळातील निवडणुकीचा अंदाज घेत आपल्या घेऊन विजयी होणार याचा ताळमेळ वसवित आहेत. प्रत्येक पक्षाकडून उमेदवाराला किती मतांनी आघाडी कोणाला नगराध्यक्ष पदाची उमेदवार मिळणार यावरही आराखडे आखले जात आहेत.मात्र प्रत्येक पक्षात पाच ते सहालोक नगराध्यक्ष पदाची उमेदवारी मिळवण्यासाठी इच्छुक असल्याने दिसून येते. इच्छुकांची भाऊ गर्दी रंगणार असे दिसते. त्यामुळे उमेदवारी न मिळाल्याने नाराज होणारे इत्तर लक्षात घेता ही निवडणूक चांगलीच पदाधिकारी आपल्या उमेदवारांचा प्रचार मनापासून करतात किंवा नाही हे नगरपरिषद निवडणुकीच्या वेळेस दिसून येणार आहे.

# परतवाडा-अचलपूर शहरात सुरक्षेची गळचेपी

## मुख्य चौकातील सीसीटीव्ही कॅमेरे बंद - चोऱ्यांना निमंत्रण? ईद-ए-मिलाद व अनंत चतुर्थीपूर्वी सुरक्षेचा गंभीर प्रश्न ऐरणीवर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३परतवाडा**

अतिसंवेदनशील ठरवण्यात आलेल्या परतवाडा-अचलपूर या जुळव्या शहरांतील मुख्य चौकांमध्ये लावण्यात आलेले सीसीटीव्ही कॅमेरे बंद व काही वाकलेले असल्याचे समोर आले आहे. धार्मिक उत्सवांच्या पार्श्वभूमीवर ही निष्काळजीपणा शहरातील सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत धोकादायक ठरत आहे.




नगरपरिषद व पोलीस विभागाच्या संयुक्त विद्यमाने बसविण्यात आलेले हे सीसीटीव्ही कॅमेरे सुरक्षेसाठी अत्यावश्यक मानले जातात. मात्र, सध्या ते निष्क्रिय असल्यामुळे गुन्हेगारी घटनांना आळा बसण्याऐवजी मोकळं रान मिळतंय, अशी नागरिकांची भावना आहे.

विदर्भ मिल परिसरात चोरट्यांनी नुकतीच केलेली धडक चोरी, तसेच सदर बाजारातील दागिन्यांच्या दुकानात पडलेला दरोडा हे प्रकार सीसीटीव्ही बंद असण्याच्या गंभीर परिणामाचे उदाहरण आहेत. नागरिकांचे लाखोंचे नुकसान झाले असून, त्याचा मानसिक धसकाही मोठा आहे.

येत्या काही दिवसांत ईद-ए-मिलाद, अनंत चतुर्थी यांसारखे मोठे धार्मिक उत्सव असून, अशा काळात सीसीटीव्ही कॅमेरे बंद असणे हे प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर मोठा प्रश्नचिन्ह उपस्थित करते.

शहरातील प्रतिष्ठित नागरिकांनी आणि व्यापाऱ्यांनी प्रशासनाकडे सीसीटीव्ही कॅमेरे तात्काळ दुरुस्त करून सुरक्षेच्या यंत्रणा सक्रिय करण्याची जोरदार मागणी केली आहे. अन्यथा, वाढत्या गुन्हेगारीमुळे रस्त्यांवर उतरून आंदोलनाचा इशाराही काही नागरिकांनी दिला आहे.

**नागरिकांची संतप्त प्रतिक्रिया:**

कॅमेरे लावले पण ते बंद असतील तर फायदा काय? अशा निष्क्रिय व्यवस्थेवर जनतेचा विश्वास राहणार नाही, असे मत व्यापारी वर्गातून व्यक्त होत आहे.

# वाघाच्या हल्ल्यात तारूबांदा गावातील वनमजुर ठार

## गुगामल वन्यजीव विभागातील धामणीखेडा बिट मधील घटना
## तारू बांदा परिसरातील आठ ते दहा गावांमध्ये वाघाची दहशत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३धारणी**

गुगामल वन्यजीव विभाग चिखलदरा अंतर्गत खोंगडा वर्तुळातील धामाणिखेडा बिट कंपारमेन्ट नंबर ९४४ मध्ये गस्ती करीत असतांना मंगळवार दिनांक २/९/२०२५ रोजी संध्याकाळी अंदाजे ७ वाजताच्या दरम्यान तारूबांधा येथील वनमजुर प्रेम मुन्ना कासदेकर वय ३० वर्ष याला वाघाने जंगलात गस्ती करीत असतांना अचानकपणे हल्ला करून ठार केले तर सोबत असलेला आकाश कासदेकर हा सुदैवाने बचावला या हल्लयामुळे दारू बंद परिसरातील आठ ते दहा गावातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून शेतीचा मार्ग सुद्धा त्यांच्याकडून बंद झाला आहे





गुगामल वन्यजीव विभाग चिखलदरा अंतर्गत खोंगडा वर्तुळात राजदेवबाबा कॅम्प आहे या कॅम्पवरून संपूर्ण जंगलाची पाहणी करण्यासाठी वनरक्षक व वनमजुर मुक्कामी राहतात प्रेम मुन्ना कासदेकर व आकाश दयाराम कासदेकर हे दोघे रोजदारी वनमजुर राजदेव बाबा कॅम्पवर ३ महिन्यापासून रोजनदारी वनमजुर म्हणून कामाला होते दिनांक २ सप्टेंबर मंगळवारी दोघेही धामाणिखेडा बिट कंपारमेन्ट नंबर ९४४ मध्ये गस्ती करण्यासाठी सकाळी ७ वाजता पासून गेले होते दिवसभर त्यांनी कालिकुंडी कॅम्प तसेच धामनीखेडा बिट ची पाहणी केली तसेच संध्याकाळच्या वेळेला ते पुन्हा आपल्या निवासस्थानी राजदेव बाबा बिट कडे प्रेम व आकाश एका मागून एक बोलत चालत येत होते काही अंतर पार केल्यानंतर प्रेम चे मागून आवाज येणे बंद झाले तेव्हा आकाश मागे वळून पाहतो तर प्रेम रस्त्यावर दिसलाच नाही आकाश ने प्रेम ला मोठ्या मोठ्याने आवाज दिला इकडे तिकडे शोधले तरी प्रेम दिसलाच नाही त्यामुळे प्रेम ने अंधार पडल्यावर काहीच दिसेनासे झाले म्हणून राजदेव बाबा कॅम्प कडे धावत सुटला व कॅम्पवर पोहचून वनरक्षक व वरिष्ठांना या घटनेची हकीगत कळवली त्यावेळी रात्रीचे ११ वाजले होते काळी कुट्ट अंधार रात्र व पाऊस सुरु होते रात्री ११ वाजताच्या दरम्यान वनविभागात वनरक्षक, वनपाल, वनपरिक्षेत्र अधिकारी असा दोन ते तीन डझन कर्मचारी प्रेम च्या शोधार्थ निघालेत रात्र भर शोध मोहीम चालविली तरी आकाश रात्रीला सापडला नाही पुन्हा ३ सप्टेंबर बुधवार रोजी सकाळ पासून वनकर्मचारी तसेच चिखलदरा पोलिसांनी शोध मोहीम आरंभली असता प्रेम कासदेकर याचा मृतदेह एका झुडुपात आढळून आला त्यावेळी त्याच्या शरीरावर वाघाने ओरबळले निशान तसेच एक हात नसल्याचे दिसून आले सदर मृतदेह हा कंपारमेन्ट ९४४ मध्ये आढळून आला असून तो वनमजुराच्या साह्याने मुख्य रस्त्यावर आणण्यात आला व शवविच्छेदन करण्यासाठी ग्रामीण रुग्णालय अचलपूर येथे नेण्यात आला त्यावेळी वनविभागाच्या सहाय्यक वनसंरक्षक प्राची उरडे, वनपरिक्षेत्र अधिकारी, वनपाल ,वनरक्षक ,वनमजुर उपस्थित होते त्यावेळी तारूबांदा गावातील संपूर्ण गावकरी तेथे हजर होते त्यांच्याकडून वनविभागाच्या अधिकाऱ्यांना या हल्लेखोर वाघाला जेरबंद करण्याची मागणी करण्यात आली असून वनविभागाने गावकऱ्यांना लवकर लवकरच काहीतरी निर्णय घेण्यात येईल अशी आश्वासन दिले आहे

# महाराष्ट्रात मतचोरीचा पहिला प्रयोग नागपूर जिल्ह्यात - हर्षवर्धन सपकाळ



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३नागपूर**

देशात सध्या मतचोरीचा मुद्दा गंभीर बनला आहे. परंतु महाराष्ट्रात मत चोरीचा पहिला प्रयोग नागपूर जिल्यातील एका मतदारसंघातून सुरू झाला, असा गंभीर आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला.

नागपूर जिल्ह्यातील कामठी येथे आयोजित राज्यस्तरीय मेळाव्यात ते बोलत होते. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने काँग्रेस कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते. हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले, नागपूर जिल्यातील भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे प्रदेशाध्यक्ष असतांना कामठी मतदार संघात गाव- गावात मतचोरी केली गेली. येथे एकाच खोलीतून पाच-पाचशे नावे मतदारयादीत समाविष्ट केले गेले. त्यामुळे कामठीत मतचोरीकरून हा प्रयोग राज्यात सर्वत्र राबवल्या गेल्याचाही आरोप, हर्षवर्धन सपकाळ यांनी केला.

उलटा चोर कोतवाल को डाटे' ही म्हण मत चोरीच्या अनुषंगाने सिद्ध होत असल्याचे वारंवार पुरावे मिळत आहेत. निवडणूक आयोगच स्वत: उलटा कांगावा करत आहे. आता लोकशाही वाचवण्यासाठी व आपला संविधान अधिकार जागृत करण्यासाठी आपल्याला एक होण्याची गरज असल्याचेही सपकाळ यांनी सांगितले.

भारतीय जनता पक्षाने निवडणूक आयोगाच्या मदतीने मतदार याद्या व मतदान प्रक्रियेत मोठा घोळ घालून सत्ता मिळवल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. त्याविरोधात काँग्रेसचे बुधवारी नागपूर जिल्यातील कामठीत काँग्रेसचा 'वोट चोर, गद्दी छोड' मेळावा आयोजित केला आहे. मेळाव्यात काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यात्रेतून पोहचले. त्यांच्यासोबत प्रदेश आणि जिल्या पदाधिकारी होते.

# गणेशोत्सवानिमित्त ईदची मिरवणूक पुढे तर ढकलली, मात्र सुट्टीचे काय?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अकोला**

गणपती विसर्जन मिरवणूक व 'ईद ए मिलाद' निमित्त निघणाऱ्या मिरवणुकांच्या निमित्ताने अकोल्यात हिंदू - मुस्लीम एकात्मतेचा अनोखा संदेश देण्यात आला आहे. शहरात सौहार्द व सामाजिक एकोप्याला प्राधान्य देत गणेशोत्सवामुळे 'ईद ए मिलाद'ची मिरवणूक पुढे काढण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला. मात्र, आता ईदनिमित्त ५ सप्टेंबरच्या सुट्टीचे काय? असा प्रश्न निर्माण झाला.

'मरकज जमाते अहले सुन्नत बरार' व ईद-मिलादुन्नबी मिरवणूक समितीने जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांकडे आता ईदची मिरवणूक नियोजित असलेल्या ९ सप्टेंबरला सुट्टी देण्याची मागणी केली आहे. गणेशोत्सव सध्या मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे. ६ सप्टेंबरला अनंत चतुर्दशी असून या दिवशी शहरातून गणपती विसर्जन मिरवणूक काढण्याची मोठी परंपरा आहे. मुस्लीम समाजाचा 'ईद ए मिलाद' ५ सप्टेंबर रोजी आहे. या सणानिमित्त



मुस्लीम समाजाकडून देखील शहरातून मिरवणूक काढली जाते. दोन दिवसांत दोन मोठ्या मिरवणुका निघाल्यास प्रशासनावर प्रचंड ताण येऊ शकतो.

त्यामुळे गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मुस्लीम समाजाने आपली मिरवणूक पुढे ढकलून ९ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता ताजनापेठ कच्छी मशिदीसमोरून पारंपरिक मार्गाने काढण्याचा निर्णय घेतला. सलग तिसऱ्या वर्षी मुस्लीम समाजाने हा निर्णय घेऊन एकतेचा आदर्श घालून दिला. त्या पार्श्वभूमीवर विद्यार्थी ईद मिरवणुकीत सहभागी होण्यासाठी शाळा-महाविद्यालयांना त्यादिवशी सुट्टी जाहीर करण्याची मागणी केली आहे.

**दोन्ही मिरवणुकांमध्ये पदाधिकाऱ्यांचा सत्कार**

गणपती विसर्जन मिरवणुकीमध्ये ताजनापेठ येथे मुस्लीम समाजाकडून गणेश मंडळाच्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार केला जाणार आहे, तर गांधी चौकात गणेशोत्सव मंडळाकडून 'ईद ए मिलाद'च्या मिरवणूक समितीचा सत्कार करण्यात येईल.